# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

August 2024 - September 2024 / Issue No. 03 | Price : Rs. 30/-




## १८ वा स्थापना दिवस संपन्न

### ललित गांधी तिसऱ्यांदा अध्यक्ष



## राज्यस्तरीय व्यापार बंद "तात्पुरता स्थगित..."


BSE
MACCIA








उद्घाटक व सत्कारमूर्ती
मान. श्री. उदयजी सामंत


BSE
MACCIA




BSE
उद्घाटक व सत्कारमूर्ती
मान. श्री. उदयजी सामंत

MACCIA 100
Apex Chamber of the State 1927-2027
MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE

# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

August 2024 - September 2024/ Issue No. 3

**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रिकल्चर**

ओरिकॉन हाऊस, ६ वा मजला, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स मार्ग, काळा घोडा, फोर्ट, मुंबई- ४००००१
फोन : (०२२) २२८५५८५९/६०
ई-मेलः maccia@maccia.org.in
वेबसाईट : www.maccia.org.in

**संपादकीय समिती**

- अध्यक्ष व संपादक
  **ललित गांधी**
- वरिष्ठ उपाध्यक्ष
  **रविंद्र माणगावे**
- उपाध्यक्ष
  **करूणाकर शेट्टी** **शंकर शिंदे**
  **संजय सोनवणे** **संगीता पाटील**
  **रमाकांत मालु** **दिलीप गुप्ता**
  **प्रफुल मालाणी** **श्रीकृष्ण परब**
- सरकार्यवाह : **सुरेश घोरपडे,**
  सहसंपादक : **अविनाश पाठक**

- **उत्तर महाराष्ट्र विभागीय कार्यालय**
  ४९, पाचवा मजला, बिजनेस बे, श्रीहरी कुटे मार्ग, मुंबई नाका, नाशिक - ४२२००१
  फोनः (०२५३)२५७७७०४
- **पूणे जिल्हा कार्यालय**
  प्लॉट नं. ईएल-१५, एमआयडीसी, भोसरी, पूणे - ४११०२६.
- **जळगांव जिल्हा कार्यालय**
  २१-ए,श्रीराम स्टेट बँक कॉलनी, रिंगरोड, जळगाव - ४२५००१
- **कोल्हापूर जिल्हा कार्यालय**
  बिझनेस हाऊस, राजारामपूरी १० वी गल्ली, कोल्हापूर - ४१६००८
- **बारामती जिल्हा कार्यालय**
  प्लॉट नं. सी–८८, हॉटेल सुर्या जवळ, एमआयडीसी भिंगवान रोड, बारामती, पुणे – ४१३१३३

**इतर कार्यालय :** अंधेरी (मुंबई), नवी मुंबई, ठाणे, पालघर, धुळे, रत्नागिरी, पलुस (सांगली)

**Note :** Articles published in this bulletin do not necessarily reflect the views of the Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture.

## अंतरंग

१. व्यापाऱ्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्यासाठी संयुक्त समिती गठीत करू - देवेंद्र फडणवीस
२. लेख - गुंतवणुकीत महाराष्ट्र अग्रेसर : उद्योगमंत्री उदयजी सामंत
३. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सने आजारी लघु उद्योगांच्या पुनरूज्जीवनासाठी कार्य करावे - उदय सामंत
४. राज्याच्या विकासात महाराष्ट्र चेंबरचे ऐतिहासिक योगदान : मंगलप्रभात लोढा
५. भारत २०३० पर्यंत जागतिक स्तरावार अप्पर-मध्यम उत्पन्न असणारा तर २०५० पर्यंत अमेरिका, जपान, इंग्लैंड या सारख्या उच्च उत्पन्न असणारा देश बनेल - नीती आयोगाचे सदस्य डॉ. अरविंद वीरमणी यांचे प्रतिपादन
६. पहिली विमानसेवा पूणे, हैदराबाद, तिरुपती, गोवाकरिता सुरू होणार : चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी
७. सोलापूर जिल्हास्तरीय व्यापारी परिषद
८. उद्योगमंत्र्यासमवेत बैठक घेऊन औद्योगिक वसाहतीचे प्रश्न मार्गी लावू : ललित गांधी
९. 'प्राईड ऑफ इंडिया आयकॉन' या पुरस्काराने महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी सन्मानित
१०. व्यापारी उद्योजकांच्या विविध समस्या प्राधान्याने दूर केल्या जातील - डायरेक्टर जनरल ऑफ फॉरेन ट्रेड चे महासंचालक संतोष कुमार सारंगी



## संपादकीय..

**येणाऱ्या नवरात्रोत्सव व दिपावली पर्वाच्या सर्वांना अग्रिम शुभेच्छा !**

राज्या च्या शिखर संस्थेच्या ९८ व्या स्थापना दिनाचे औचित्य साधुन आयोजित **'राज्यस्तरीय उद्योग परिषद'**, वार्षिक सर्वसाधारण सभा व राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते 'अध्यक्ष' पदाचा कार्यभार तिसऱ्यांदा स्विकारताना आनंदाबरोबर अधिकच्या जबाबदारीची जाणीव होती.

महाराष्ट्र चेंबरच्या १०० वर्षाचा कार्यकाळ पुर्ण करणाऱ्या या ऐतिहासिक कार्यकारीणीचे व राज्याच्या शिखर संस्थेचे नेतृत्व करणे जितके गौरवास्पद तितकेच आव्हानात्मक आहे याची मला पूरेपूर जाणीव आहे.

दृष्टे उद्योजक व प्रखर देशभक्त शेठ वालचंद हिराचंद यांनी १९२७ साली चेंबरची स्थापना केली. त्यानंतरच्या अध्यक्षांनी आपापल्या कार्यकाळात महत्वपूर्ण योगदान दिले म्हणून आज आपण संस्थेमधील विविध पदांच्या माध्यमातुन कार्यरत आहोत.

येणाऱ्या शंभर वर्षात संस्था अधिक कार्यक्षमपणे, सक्षम पणे व प्रभावीपणे कार्यरत रहावी याचे नियोजन व पायाभरणी करण्याची जबाबदारी या कार्यकारीणीवर आहे.

ऐतिहासिक कालखंडात शिखर संस्थेचे नेतृत्व करताना चेंबरला सुदृढ व भक्कम करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांच्या सहकार्याने व सहभागाने पुर्ण करेन याचा दृढ विश्वास आहे.

देशाच्या अमृतकाळातील वाटचालीत महाराष्ट्राची भुमिका महत्वपूर्ण असणार आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक युवा हा नुसता शिक्षित न राहता कौशल्यपूर्ण असेल. व्यवसाय व रोजगारक्षम असेल हे आव्हान पेलण्यासाठी 'महाराष्ट्र चेंबर' कटीबध्द आहे.

युवक-युवतींना नवीन व्यापार-उद्योगाच्या संधीची माहीती देणे, नवीन रोजगाराच्या संधीची माहीती देणे, निर्यातीतील नवीन क्षेत्रे उद्योजकांसाठी खुली करणे. याबरोबरच व्यवसाय सुलभता, कर रचनेतील त्रुटी दुर करून भारतातील व्यापार वाढविण्यासाठी 'महाराष्ट्र चेंबर' सर्वार्थाने कार्यरत आहे.

महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे 'बिझनेस एक्सलंट सेंटर' उभारण्याची योजना जाहीर केली आहे. त्या 'बिझनेस एक्सलंट सेंटर' च्या माध्यमातुन चेंबरचे उपक्रम सर्वांपर्यत पोहचविण्याबरोबरच त्या त्या जिल्ह्यामध्ये नवतरूणांना व्यापार उद्योजकांचे मार्गदर्शनाचे केंद्र असेल व त्या ठीकाणी कौशल्य प्रशिक्षणाचे केंद्र सुध्दा असेल अशा प्रकारच्या केंद्रांच्या माध्यमातुन प्रत्येक जिल्ह्यापर्यंत महाराष्ट्र चेंबरचे कार्य पोहोचावे अशी योजना आपण सर्वांनी मिळून आखली आहे.

राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यापर्यंत पोहोचुन सर्व स्थानिक व्यापार-उद्योग संस्था संघटनांना सोबत घेऊन राज्याला देशात क्रमांक एक चे राज्य बनविण्यासाठी आपण सर्वजण प्रयत्न करूया.

**संघटीतपणे व एकत्रितपणे केलेले आपले प्रयत्न नक्कीच यशस्वी होतील.**

धन्यवाद !

ललित गांधी

**अध्यक्ष**



◆ राज्य शासनातर्फे मा. उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथील सह्याद्री शासकीय अतिथीगृह येथे उच्चस्तरीय बैठकीमध्ये व्यापाऱ्यांच्या समस्या मांडताना महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी.

# व्यापाऱ्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्यासाठी संयुक्त समिती गठीत करू - देवेंद्र फडणवीस

## राज्यस्तरीय व्यापार बंद तात्पुरता स्थगित

**मुंबई** : महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समिती तर्फे २७ ऑगस्ट रोजी पुकारलेल्या एक दिवसीय महाराष्ट्र व्यापार बंद तात्पुरता स्थगित करण्यात आल्याची माहीती कृती समिती तर्फे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली. राज्यस्तरीय कृती समिती च्या बंद ची व्याप्ती लक्षात घेऊन राज्य शासनातर्फे मा. उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथील सह्याद्री शासकीय अतिथीगृह येथे उच्चस्तरीय बैठक संपन्न झाली या बैठकीमध्ये कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, मा. आमदार श्रीमती माधुरीताई मिसाळ व पणन, वित्त सहकार, नगरविकास विभागाचे मुख्य सचिव, मा. पणन संचालक व विविध विभागातील अधिकारी वर्ग उपस्थित होते.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांनी प्रस्ताविक केले. कृती समिती चे समन्वय राजेंद्र बाठीया व दि पुना मर्चन्टस चेंबर चे अध्यक्ष रायकुमार नहार यांनी बाजार समिती च्या विविध प्रश्नाची मांडणी केली. फॅम चे अध्यक्ष जितेंद्र शहा यांनी जीएसटी चे प्रश्न मांडले. मोहन गुरनानी, दिपेन अग्रवाल व भिमजी भानुशाली यांनी चर्चेमध्ये भाग घेतला.

सुमारे दोन तास चाललेल्या या बैठकीमध्ये अत्यंत सकारात्मक चर्चा झाली. मा. देवेंद्रजी फडणवीस यांनी सर्व प्रश्न समजुन घेतले व बाजार समिती विषयासाठी तसेच जीएसटी व अन्य विषयांसाठी कृती समिती सदस्य व मुख्य सचिव व उच्च अधिकारी वर्गाची तीन समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने ३०दिवसामध्ये योग्य निर्णय घेण्याचे निर्देश मान. उपमुख्यमंत्री यांनी दिले आहेत.

दरम्यान या बैठकीपूर्वी राज्याचे मुख्यमंत्री नामदार एकनाथ शिंदे यांनी ललित गांधी यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून व्यापाऱ्यांच्या प्रश्नावर सरकार सकारात्मक असल्याची ग्वाही दिली व बंद मागे घ्यावा असे आवाहन केले.

उद्योग मंत्री उदय सामंत, नियोजन आयोगाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी व्यापाऱ्यांची भूमिका सरकारकडे प्रभावीपणे मांडण्यासाठी विशेष पुढाकार घेऊन बैठक आयोजनामध्ये सहभाग घेतला. याबाबत कृती समितीने चर्चा करून २७ तारखेचा एकदिवसीय राज्यव्यापी बंद तात्पुरता स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. सदर बैठकीमध्ये महाराष्ट्र चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, फॅम चे सचिव प्रितेश शहा, ग्रोमा चे सचिव नितेश वीरा, पुना मर्चंट चेंबर चे माजी अध्यक्ष प्रविण चोरबोले, अनिल भन्साली उपस्थित होते. ग्रोमा चे अध्यक्ष भीमजी भानुशाली यांनी आभार मानले.



◆ मा. उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना पुष्पगुच्छ व शाल देवुन सत्कार करताना महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी सोबत कौशल मंत्री मंगलप्रभातजी लोढा, आम. माधुरीताई मिसाळ, राजेंद्र बाठीया आदि पदाधिकारी



# महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यात औद्योगिक वसाहतीत अत्याधुनिक कामगार हॉस्पिटल उभारण्यात येईल : केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री समवेत लवकरच संयुक्त बैठक



**◆ महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात अत्याधुनिक कामगार हॉस्पिटल उभारण्याच्या मागणीसाठी केंद्रीय श्रम मंत्री भूपेंद्र यादव यांना निवेदन देताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी सोबत अन्य पदाधिकारी**

मुंबई : महाराष्ट्राच्या उद्योग जगतामध्ये कार्यरत कामगार वर्गाला आधुनिक वैद्यकीय सुविधा मिळाल्याच पाहिजेत ही केंद्र सरकारची भूमिका असून प्रत्येक जिल्ह्यात किमान एक अत्याधुनिक कामगार हॉस्पिटल औद्योगिक वसाहतीमध्ये उभारले जाईल अशी ग्वाही देऊन, या संबंधी नियोजन करण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज च्या पदाधिकाऱ्यासंबेत संयुक्त बैठक घेऊ अशी ग्वाही केंद्रीय श्रम मंत्री नामदार भूपेंद्र यादव यांनी दिली.

महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतीतील व अन्य कामगारांना चांगल्या वैद्यकीय सुविधा मिळाव्यात व त्यासाठी सर्व जिल्ह्यांमध्ये आधुनिक हॉस्पिटल्स उभारली जावी या मागणीसाठी महाराष्ट्र चेंबूर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष ललित गांधी व अन्य पदाधिकाऱ्यांनी केंद्रीय श्रम व पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांचे मुंबई येथे भेट घेऊन याविषयी सविस्तर चर्चा करून निवेदन सादर केले.

राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यामधल्या समस्या व अपेक्षा व वेगवेगळ्या असल्याने या संदर्भात पूर्ण राज्याचे नियोजन करण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे पदाधिकारी, ईएसआईसी विभागाचे प्रमुख अधिकारी व श्रम मंत्रालयाचे अधिकारी यांची संयुक्त बैठक लवकरच आयोजित करून सर्व प्रश्न मार्गी लावले जातील असे प्रतिपादन भूपेंद्र यादव यांनी केले.

ईएसआईसी हॉस्पिटल व्यतिरिक्तही प्रॉव्हिडंट फंड, कर्मचाऱ्यांच्या विकासाच्या योजना, उद्योजक व कर्मचारी सौहार्द या संदर्भातल्या विविध प्रश्न संबंधी या बैठकीत चर्चा करून पुढील धोरण ठरविले जाईल असेही भूपेंद्र यादव यांनी यावेळी सांगितले. राज्यातील कामगारांच्या या मागणीसाठी तात्काळ व सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांना भूपेंद्र यांनी भूपेंद्र यादव यांना विशेष धन्यवाद दिले.

यावेळी चेंबरच्या कौशल विकास समितीचे चेअरमन संदीप भंडारी व गव्हर्निंग कौन्सिल सदस्य विकास अच्छा उपस्थित होते.

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीच्या ९८ वा स्थापना दिनानिमित्त आयोजित ‘राज्यस्तरीय उद्योग परिषद’ निमित्त उद्योग मंत्री उदय सामंत यांचा विशेष लेख

# गुंतवणुकीत महाराष्ट्र अग्रेसर : उद्योगमंत्री उदयजी सामंत

केंद्र सरकारच्या उद्योग आणि अंतर्गत व्यापार विभागामार्फत प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार महाराष्ट्र पुन्हा औद्योगिक उत्पादनाच्या मोठ्या गुंतवणूक आणि व्यवसायासाठी अनुकूल असलेले सर्वात मोठे राज्य असल्याचे सिद्ध झाले आहे. या अतु–लनीय कामगिरी मुळे राज्याचा समतोल विकास होऊन मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होत आहे.



गेल्या काही दशकांपासून महाराष्ट्र हे देशाचे आर्थिक आणि औद्योगिक शक्तीस्थान आहे आणि संपूर्ण जग भारताच्या प्रगतीकडे कुतुहलाने बघत आहे. आपल्या देशातील औद्योगिक विकासाचा मार्गदर्शक असलेल्या महाराष्ट्राने वाहन आणि अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स अणि सेम ीकंडक्टर, शेती आणि अन्न प्रक्रिया, इंडस्ट्री ४.०, कापड आणि तांत्रिक वस्त्र, औषधोत्पादन आदी क्षेत्रात गुंतवणूक आकर्षित केली आहे. आपण मान्य करायला हवे की, मा. पंतप्रधान श्री नरेंद्र म ोदींच्या ५ ट्रिलियन यूएस डॉलरच्या अर्थव्यवस्थेच्या संकल्पनेचा महाराष्ट्र एक अविभाज्य भाग आहे. महाराष्ट्र हा ४३९ यूएस डॉलर इतके सकल राज्य देशांतर्गत उत्पादन असलेली देशातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे, आणि आपण १ ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेचे ध्येय गाठण्याच्या मार्गावर आहोत.

मागील दोन वर्षात महाराष्ट्राने औद्योगिक प्रगतीच्या दिशेने मोठे पाऊल उचलले आहे. महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती महत्त्वाच्या तीन स्तंभांवर आधारित आहे सक्षम धोरण, सुसज्ज पायाभूत सुविधा, भविष्यकालीन दृष्टी व कायद्याचे शासन.

या प्रगतीसाठी उद्योग विभाग आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व्यावसायिकांना पूर्ण समर्थन देत आहे. भारत सरकारने महाराष्ट्राच्या क्षमतेवर विश्र्वास ठेऊन मोठ्या प्रकल्पांना अनुदान उपलब्ध करून दिले आहे. देश–विदेशातून लहान, मध्यम व मोठ्या कंपन्यांमधून नियमित गुंतवणूक येत आहे आणि या प्रक्रियेत सुमारे ८०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक नोंदवली गेली आहे.

संतुलित प्रादेशिक विकास केवळ मुंबई, पुणे आणि कोकण विभागांपुरताच सीमित राहिलेला नाही, तर विदर्भ, मराठवाडा आणि खान्देश या विभागांमध्ये देखील गुंतवणुकीसाठी पायाभूत सुविधा विकास करण्यात आला आहे. उद्योजकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी एमआयडीसी मार्फत नव्याने जमीन संपादित केली आहे, जेणेकरून पुढील औद्योगिक प्रगती साधता येईल. या विभागांम धील औद्योगिक क्षेत्रात अधिक व्यापक विकास घडवून आणण्यासाठी राज्य शासनाने विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ आणि एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या आर्थिक वर्षांमध्ये महाराष्ट्राने देशातील सर्वाधिक थेट परकीय गुंतवणूक (FDI) आकर्षित केली आहे. ही गुंतवणूक देशाच्या एकूण एफडीआय गुंतवणुकीच्या ३०% इतकी आहे. एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ मध्ये १,१८,४२२ कोटी रुपयांची गुंतवणूक प्राप्त झाली असून, एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ मध्ये १,२५,१०१ कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित झाली आहे.

याशिवाय, गेल्या दोन वर्षांत एकूण ५.१० लाख कोटी रुपयांच्या १८४ सामंजस्य करारांवर स्वाक्षरी केली आहे. दावोस, स्वित्झर्लंड येथे पार पडलेल्या गुंतवणूक परिषदेत २०२३ मध्ये एकूण १९ सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली असून, १,३७,६६६ कोटी रुपयांची गुंतवणूक प्राप्त झाली आहे. त्याद्वारे १,०१,३८९ व्यक्तींना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झाला आहे. तर २०२४ मध्ये दावोस येथील परिषदेत एकूण २३ सामंजस्य करारांवर स्वाक्षरी झाली असून, ३,००,२३३ कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित झाली आहे, त्यातून सुमारे १,७९,७८० रोजगार उपलब्ध झाला आहे. आतापर्यंत राज्याची एकूण गुंतवणूक १२,१०,१६५ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली असून ७,६७,२७८ रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

सर्वात महत्त्वपूर्ण बाब म्हणजे, गेल्या दोन राज्यात शाश्वत गुंतवणूक व्हावी याउद्देशाने राज्याच्या मंत्रिमंडळ

उपसमितीने अनेक बैठका घेतल्या. याबैठकांच्या माध्यानातून उद्योजकांना आवश्यक असलेले सहकार्य करून रुपये ४,३२,०६२ कोटींच्या गुंतवणूकीस चालना दिली आहे. या माध्यमातून एकूण दोन लाखांपेक्षा अधिक रोजगार उपलब्ध होणार आहे. शिवाय, राज्यभरात जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदा आयोजित करून ९६,६८१ कोटी रुपयांची स्थानिक गुंतवणूक प्राप्त करण्यात यश मिळविले आहे. याद्वारे, महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकूण २,३१,३३० इतका रोजगार उपलब्ध होणार आहे. यासह स्टार्टअप इंडिया हा उपक्रम देशाच्या स्टार्टअप इकोसिस्टम मध्ये नवनिर्मिती आणि गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी सुरु करण्यात आला.

कृषी व उद्योग आदी प्रकारच्या उद्योग व्यवसायांना त्यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्रात सुरू असलेले २३००० स्टार्टअप घटक असून देशात अव्वल ठरत आहे. राज्यातील ३६ जिल्हांमध्ये राबवण्यात आलेल्या विविध उपक्रमांमुळे स्टार्टअपबाबत मोठी जनजागृती करण्यात आली आहे.

राज्यातील युवक युवतींना स्वयंपूर्ण आत्मनिर्भर बनविण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ही योजना राबविण्यात आली आहे. या योजनेचा उद्देश युवकांना आत्मनिर्भर करून त्यांचे स्वयंरोजगार प्रकल्प राज्य शासनाच्या आर्थिक सहाय्यातून सुलभतेने स्थापित करण्याचा आहे. या योजनेअंतर्गत सन २०२२-२३ व २०२३-२४ मध्ये एकूण ७१४.६ कोटी रुपयांचा निधी वितरीत करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत ठेवलेल्या उद्दिष्टांपैकी अनुक्रमे १७८ १% व ७९ १% वाढ साध्य झाली आहे.

समृद्धी महामार्ग हा महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक विकासात मोलाची भूमिका बजावत आहे. या महामार्गामुळे नागपूर ते मुंबई या दोन प्रमुख शहरांदरम्यान दळणवळणाच्या सोयींमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा झाली आहे, यामुळे राज्यातील औद्योगिक, शेती आणि पर्यटन क्षेत्रांना गती मिळाली आहे. समृद्धी महामार्गाच्या दोन्ही बाजूंना औद्योगिक आणि व्यावसायिक केंद्रे स्थापन करण्यात येणार असून, त्यामूळे राज्यातील विविध जिल्ह्याचा संतुलित विकारा साधला जाणार आहे.

समृद्धी महामार्गासोबतच महाराष्ट्र शासनाने निर्यात केंद्रित उद्यानांच्या (Export-Oriented Parks) स्थापनेसाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. या निर्यात आधारित पार्क्सच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्रातील उत्पादनांची निर्यात वाढविण्यावर लक्ष केंद्रित केले जात आहे. या पार्कमध्ये अद्ययावत पायाभूत सुविधा आणि जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन क्षमतांमध्ये वाढ होईल, साहाजिकच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत राज्याचा हिस्सा अधिक वाढेल. राज्य शासनाच्या या उपक्रमांमुळे महाराष्ट्र निर्यात क्षेत्रात आघाडीवर राहणार आहे.

केंद्र सरकारने देशभरात सात ठिकाणी पीएम मित्रा पार्क स्थापन करण्यास मंजूरी दिली आहे, ज्यामुळे औद्योगिक क्षेत्राला आणखी गती मिळणार आहे. राज्यात, पीएम मित्रा टेक्सटाईल पार्क अमरावतीमध्ये उभारला जात आहे, हा पार्क समृद्धी महामार्गाजवळ असून पूर्व महाराष्ट्रातील नागपूर ते पश्चिमेकडील मुंबईला जोडतो. यात १९ नियोजित औद्योगिक टाउनशिप आहेत आणि उत्कृष्ट रस्त्यांची जोडणी देखील आहे, तसेच पीएम मित्रा पार्कचे समृद्धी महामार्गाजवळील मोक्याचे स्थान आणि लॉजिस्टिक हबसोबतचे कनेक्शन, गुंतवणूकदारांसाठी अनुकूल धोरणे आणि अत्याधुनिक पायाभूत सुविधांद्वारे उत्कृष्ट संधी उपलब्ध करून देईल. सदर पार्क केवळ एक जागा नाही, तर सामूहिक स्वप्ने आणि आकांक्षांना मूर्त रूप देणारे ठिकाण आहे.

पीएम मित्रा पार्क धोरण हा भारत सरकारचा महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे, ज्याचा उद्देश वस्त्र उद्योगाला जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवणे आणि रोजगारनिर्मितीला चालना देणे आहे. महाराष्ट्र राज्याने या धोरणाअंतर्गत महत्त्वपूर्ण प्रगती केली आहे. वस्त्रोद्योगाच्या विकासासाठी अत्याधुनिक पायाभूत सुविधा, संशोधन व नवनवीन उपक्रमासाठी लागणारे तंत्रज्ञान, आणि जागतिक दर्जाचे प्रशिक्षण केंद्रे या पार्कमध्ये उपलब्ध असतील. या पार्कच्या माध्यमातून राज्यातील वस्त्र उद्योगाला गती मिळेल आणि निर्यातक्षम उत्पादने निर्माण करता येतील. या पार्कमध्ये उत्पादन, डिझाइन, प्रक्रिया, आणि गुणवत्ता नियंत्रण यांसारख्या सर्व सुविधांची एकत्रित व्यवस्था केली जाणार आहे. या धोरणामुळे महाराष्ट्रातील वस्त्रोद्योग जागतिक बाजारपेठेत मोठी भूमिका बजावेल आणि राज्याच्या आर्थिक प्रगतीसाठी नवे आयाम उघडले जातील. संपूर्ण वस्त्रोद्योग मूल्य साखळी एकत्रित करण्याचा आणि उद्योगातील सर्व क्षेत्रांच्या शाश्वत वाढीसाठी सक्षम वातावरण निर्माण करण्याचा शासनाचा उद्देश आहे. हे वस्त्रोद्योग क्षेत्राच्या पुरवठा साखळी व्यवस्थापनाला बळकट करेल.




◆ महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री मान. नाम. उदयजी सामंत यांच्या हस्ते अध्यक्षीय ट्रॉफी देऊन नूतन अध्यक्ष ललित गांधी यांना पदभार देण्यात आला सोबत वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, ट्रस्ट बोर्ड चेअरमन आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी,रमाकांत मालु, दिलीप गुप्ता, शंकर शिंदे, प्रफुल मालाणी, श्रीकृष्ण परब, निमंत्रित सदस्य विजय वेदमुथा, कांतीलाल चोपडा, माजी अध्यक्ष संतोष मंडलेचा, सेक्रेटरी जनरल सुरेश घोरपडे आदि मान्यवर.

# महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सने आजारी लघु उद्योगांच्या पुनरूज्जीवनासाठी कार्य करावे - उदय सामंत

## ललित गांधी यांना अध्यक्षपदाचा पदभार स्विकारला

**मुंबई** : महाराष्ट्राच्या औद्योगिकरणाचा पाया रचण्याबरोबरच गेल्या १०० वर्षात उद्योग–व्यापाराच्या सर्वांगिण विकासासाठी शिखर संस्था या नात्याने काम करणाऱ्या 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' या संस्थेने राज्यातील आजारी लघु उद्योगांच्या पुनरूज्जीवनासाठी विशेष अभियान राबवावे, महाराष्ट्र शासन त्यामध्ये सहभागी होईल अशी सुचना राज्याचे उद्योगमंत्री नाम. उदय सामंत यांनी केली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर च्या ९८ व्या स्थापना दिवसानिमित्त आयोजित 'राज्यस्तरीय उद्योग परीषद' व अध्यक्ष पदग्रहण समारंभाचे उद्घाटक या नात्याने मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

मुंबई स्टॉक एक्सचेंज च्या इन्टरनॅशनल कन्वेन्शन हॉल मध्ये संपन्न झालेल्या भव्य समारंभात उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी यांनी अध्यक्षीय कप देऊन कार्यभार प्रदान केला.

उद्योगमंत्री सामंत पुढे म्हणाले की महाराष्ट्र गेल्या दोन वर्षात परकीय गुंतवणुकीत क्रमांक एकवर आहे. राज्यातील उद्योगक्षेत्र प्रगतीपथावर असुन यामध्ये शेठ वालचंद हिराचंद यांच्या सारख्या दृष्ट्या नेत्याने स्थापन केलेल्या 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' चे योगदान अत्यंत महत्वपूर्ण आहे.

महाराष्ट्र चेंबर तर्फे उद्योग, व्यापार जगताच्या विकासासाठी वेगवेगळे उपक्रम सातत्याने सुरू आहेत. या उपक्रमांबरोबर महाराष्ट्र चेंबर तर्फे सुरू करण्यात येणाऱ्या कौशल्य विकास व उद्योजकता केंद्रांना उद्योग विभाग व महाराष्ट्र सरकार चे पूर्ण सहकार्य राहील अशी ग्वाही दिली.

उद्योग परिषदेचे प्रस्ताविक करताना नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबर च्या ९७ वर्षातील वैशिष्ट्यपुर्ण कार्याचा आढावा घेतला.

सरकारने औद्योगिक वसाहती स्थापन करण्याची संकल्पना महाराष्ट्र चेंबर ने १९५५ साली मांडली त्यातुन एमआयडीसी चा जन्म झाला. उरण ते मुंबई समुद्रावर पुल







**◆ राज्यस्तरीय उद्योग विकास परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना उद्योगमंत्री नाम. उदय सामंत, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी व्यासपीठावर उपस्थित उपाध्यक्ष संगिता पाटील, शंकर शिंदे, दिलीप गुप्ता.**

बांधण्याचा प्रस्ताव १९७५ साली सादर केला तो अटल सेतु च्या रूपाने कार्यान्वित झाला आहे.

सरकारची वेगवेगळी धोरणे ठरविण्यात चेंबर चा सहभाग महत्वपूर्ण असण्याची माहीती देऊन ललित गांधी यांनी गेल्या दोन वर्षात महाराष्ट्र चेंबर ने उद्योगांचे प्रलंबित अनुदान मिळवून देणे, कोरोना काळाची अनुदान योजनेची मुदतवाढ, २० नवीन एमआयडीसीची मंजुरी, सध्याच्या औद्योगिक वसाहतींच्या पायाभुत सुविधांच्या विकासासाठी केलेले कार्य बाजार समित्यांचा सेस व अन्य अडचणीतुन मार्ग काढण्यासाठी सुरू असलेले कार्य, जीएसटी मधील सुधारणा, एलबीटी विभाग बंद करण्यास मान्यता आदी कार्यांचा उल्लेख केला.

याप्रसंगी मुंबई स्टॉक एक्सचेंज च्या मुख्य नियामक अधिकारी कमला कांताराज, सहाय्यक मुख्य व्यवस्थापक राधा कीर्तीवासन प्रमुख उपस्थित होत्या.

यावेळी चेंबरचे नवनिर्वाचित पदाधिकारी वरीष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, शंकर शिंदे रमाकांत मालू ,दिलीप गुप्ता,संजय सोनवणे, संगिता पाटील, प्रफुल्ल मालानी, श्रीकृष्ण परब  यांनी पदग्रहण केले.

चेंबरच्या उपाध्यक्षा संगीता पाटील यांनी सुत्रसंचालन केले. रविंद्र माणगावे यांनी स्वागत केले तर रमाकांत मालु यांनी आभारप्रदर्शन केले.




**◆ महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांची 'अध्यक्ष' पदि निवड झाल्याबद्दल उद्योगमंत्री नाम. उदय सामंत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, उपाध्यक्ष रमाकांत मालु, उपाध्यक्ष दिलीप गुप्ता**




**◆ अध्यक्ष ललित गांधी यांना निवेदन देतांना कार्यकारीणी सदस्य दिलीप गांधी, महेंद्र सायसोनी, नितीन इंगळे, अरविंद दहाड, उपाध्यक्षा सौ. संगिता पाटील.**








◆ राज्यस्तरीय परिषदेचे उद्धाटनाप्रसंगी दिपप्रज्वलन करतांना उद्योगमंत्री नाम. उदय सामंत, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, बीएसईच्या सहाय्यक मुख्य व्यवस्थापक राधा कीर्तीवासन









◆ महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रिकल्चरच्या ९८ व्या स्थापना दिनानिमित्त संस्थापक अध्यक्ष शेठ वालचंद हिराचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करता अभिवादन करतांना उद्योगमंत्री नाम. उदय सामंत, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, व्यवस्थापन समिती निमंत्रित सदस्य कांतीलाल चोपडा. दुसऱ्या छायाचित्रात राज्यस्तरीय कौशल्य विकास परिषदेत मार्गदर्शन करतांना वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे तिसऱ्या छायाचित्रात परिषदेचे सूत्रसंचालन करतांना उपाध्यक्षा सौ. संगिता पाटील







◆ महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रिकल्चरच्या ९८ व्या स्थापना दिन व ९७ वी वार्षिक सर्वसाधारण सभेप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, व्यवस्थापक समिती निमंत्रित सदस्य कांतीलाल चोपडा, विजय वेदमुथा, उपाध्यक्ष श्रीकृष्ण परब, उपाध्यक्ष प्रफुल्ल मालानी, उपाध्यक्ष रमाकांत मालू, उपाध्यक्ष शंकर शिंदे, माजी अध्यक्ष संतोष मंडलेचा, उपाध्यक्ष दिलीप गुप्ता, उपाध्यक्षा सौ. संगिता पाटील, माजी उपाध्यक्ष झांबड, सेक्रेटरी जनरल सुरेश घोरपडे दुसऱ्या छायाचित्रात महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्षा सौ. संगिता पाटील, महिला समितीच्या चेअरमन डॉ. धनश्री हरदास, चीफ पेट्रोन मेंबर आसावरी देशमुख यांच्या समवेत अन्य मान्यवर महिला सदस्य




◆ महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रिकल्चरच्या ९८ व्या स्थापना दिन व ९७ वी वार्षिक सर्वसाधारण सभेप्रसंगी मतप्रदर्शन करतांना विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, उपाध्यक्ष संजय सोनवणे, उपाध्यक्ष रमाकांत मालू, समितीचे चेअरमन डॉ. यु. के. शर्मा.




◆ महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रिकल्चरच्या ९८ व्या स्थापना दिन व ९७ वी वार्षिक सर्वसाधारण सभेप्रसंगी मतप्रदर्शन करतांना माजी उपाध्यक्ष तनसुख झांबड, महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन डॉ. धनश्री हरदास, कार्यकारीणी सदस्य रेखा पागधरे, रमेश आरवाडे




◆ महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रिकल्चरच्या ९८ व्या स्थापना दिन व ९७ वी वार्षिक सर्वसाधारण सभेप्रसंगी मतप्रदर्शन करतांना बेदमुथा ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे अजय बेदमुथा, माजी उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, कार्यकारीणी सदस्य सर्जेराव नलावडे, अरविंद दहाड, केतन शहा




◆ **राजस्तरीय कौशल्य विकास परिषदेत मार्गदर्शन करतांना कौशल्य विकास व नवउद्योजकता मंत्री नाम. मंगलप्रभात लोढा समवेत व्यासपीठावर अध्यक्ष ललित गांधी, के. कमला, वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, बॉम्बे स्टॉक एक्सचेंजच्या प्रमुख नियंत्रक अधिकारी कांता कमला, उपाध्यक्ष शंकर शिंदे, उपाध्यक्ष दिलीप गुप्ता, उपाध्यक्ष रमाकांत मालू, उपाध्यक्षा सौ. संगिता पाटील, विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, व्यवस्थापन समिती निमंत्रित सदस्य कांतीलाल चोपडा, विजय वेदमुथा, उपाध्यक्ष श्रीकृष्ण परब.**

# राज्याच्या विकासात महाराष्ट्र चेंबरचे ऐतिहासिक योगदान : मंगलप्रभात लोढा

## कौशल्य विकासासाठी महाराष्ट्र चेंबर कटिबद्ध : ललित गांधी

**मुंबई** : नवभारत घडवण्याच्या चळवळीमध्ये व्यापार, उद्योग क्षेत्राचे महत्व रचनात्मक आहे. महाराष्ट्राची राजधानी मुंबई हे जगाचे आर्थिक आणि व्यापार केंद्र व्हावे यासाठी भारत सरकार कटिबद्ध असून महाराष्ट्र शासनही पूर्ण ताकदीनिशी प्रयत्नशील आहे. महाराष्ट्र चेंबर या व्यापार, उद्योग क्षेत्रातील शिखर संघटनेने पारतंत्र्याच्या काळामध्ये आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही राज्याच्या व्यापार उद्योग विकासासाठी केलेले कार्य वाखाणण्याजोगे आहे. आताच्या काळामध्ये म्हणूनच महाराष्ट्र चेंबरच्या योगदानाची भूमिका अतिशय मोलाची असेल असे प्रतिपादन महाराष्ट्राचे कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले. ते महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चरतर्फे आयोजित राज्यस्तरीय कौशल्य विकास परिषदेत कौशल्य विकासामध्ये महाराष्ट्राची भरारी याविषयावर मार्गदर्शन करतांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आर्थिक व बांधकाम क्षेत्रातील नामवंत उद्यो जक आणि महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी हे होते.

यात्रसंगी कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा यांचा जाहीर सत्कार महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन करण्यात आला.

तसेच महाराष्ट्र चेंबरच्या पेट्रोन सदस्यांचा सत्कार कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते करण्यात आला. परस्पर सहकार्य मंत्र व्यापारी, उद्योजक, व्यावसायीक हे आपल्या सर्व शक्तिनिशी त्यांच्या व्यापारामध्ये मग्न असतात. तो सुरळीत चालावा म्हणून सरकारने अडथळे न निर्माण करता त्यांना पूरक अशी पायाभूत सेवा व सकारात्मक धोरण द्यावे अशी त्यांची रास्त अपेक्षा असते. महाराष्ट्र शासन यादृष्टीने आपली भूमिका बजावत असताना व्यापाऱ्यांनी परस्पर सहकार्याचा मंत्र जपत सामूहिकरित्या प्रयत्नांतून महाराष्ट्राचा व्यापार वृद्धिंगत कसा होईल याकडे लक्ष द्यावे असे आवाहनही त्यांनी केले.

सर्वत्र बेरोजगारीची चर्चा होते परंतु हि बेरोजगारी कौशल्याच्या अभावामुळे आहे. असे कौशल्य नवयुवकांमध्ये प्रशिक्षणाद्वारे देण्यासाठी राज्य सरकारने कौशल्य



◆ **कौशल्य विकास व नवउद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्याशी संवाद साधतांना अध्यक्ष ललित गांधी सोबत वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे उपाध्यक्ष रमाकांत मालु**

विकास योजना अंमलात आणली आहे. त्यामध्ये प्रशिक्षणाचा सुरवातीचा खर्च शासन देणार आहे. अशा योजनेचा महाराष्ट्र चेंबर सारख्या संस्थांनी लाभ घेऊन आपल्या व्यापार, उद्योगाचा विकास साधावा असेही त्यांनी आवाहन केले. अखेरीस शासनाच्या विविध योजनांद्वारे जे पैसे खर्च केले जातात त्यापैकी मोठा भार हा अखेरीस बाजारपेठेतच येत असतो आणि त्यातून व्यापारी व उद्यो जक यांचाही लाभ होत असतो हे जाणून आपण सर्वांनीच सरकारच्या योजनांमध्ये सहकार्य करावे असे आवाहन केले.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी प्रास्ताविक करताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर व्यापार उद्योग व कृषी क्षेत्राची शिखर संस्था म्हणून काम गेल्या शंभर वर्षांपासून कार्यरत आहे शेठ वालचंद हिराचंद यांनी या संस्थेची स्थापना केली स्वातंत्र्यपूर्व काळापासून जे आर डी टाटा, बिर्ला, शेठ वालचंद हिराचंद यांनी देशाच्या व राज्याच्या औद्यो गीकरणाचा पाया रचला असल्याचे सांगितले. राज्यातील व्यापार उद्यो गाला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र चेंबरची स्थापना शेठ वालचंद हिराचंद यांनी १९२७ स्थापना केली. आज ९८ वा स्थापना दिवस साजरा करण्यात येत आहे गेल्या शंभर वर्षात महाराष्ट्र चेंबरने उद्योग धोरण, अटल सेतू सारखी पायाभूत सुविधा, एमआयडीसी उभारण्याची संकल्पना या प्रमुख गोष्टी दिल्या आहेत. शेठ वालचंद हिराचंद यांनी पहिला विमान कारखाना, जहाज कारखाना उभारला व मोठ्या प्रमाणात औद्योगिक क्रांती केली. आज ९८ वा स्थापना दिवस साजरा करत असताना पुढच्या शंभर वर्षात राज्य कुठे असेल राज्याच्या औद्योगीकरणाचा वेग काय असावा याविषयी विचार विनिमय करण्यात येत असून एक ट्रिलियन डॉलर राज्याची अर्थव्यवस्था करण्यासाठी विचार मंथन या वार्षिक सभेतून होणार आहे.

तसेच महाराष्ट्र चेंबरचे धोरण काय असेल महिला सक्षमीकरण करणे, तरुणांना उद्योग करण्यास प्रोत्साहित करणे, क्लस्टर माध्यमातून छोट्या उद्द्योजकांना बळ देणे, टेक्सटाईल पॉलिसी, एक्सपोर्ट पॉलिसी हे महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्याचे काम ३६० अंशाच्या माध्यमातून महाराष्ट्र चेंबर गेले शंभर वर्ष करत असल्याचे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी यावेळी नमूद केले.

याप्रसंगी व्यासपीठावर कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र मानगवे, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, उपाध्यक्ष शंकर शिंदे, उपाध्यक्ष दीपक परब, उपाध्यक्ष संगीता पाटील, उपाध्यक्ष संजय सोनवणे, उपाध्यक्ष रमाकांत मालू, उपाध्यक्ष दिलीप गुप्ता, क्रांती चोपडा, विजय बेदमुथा, विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर उपस्थित होते. स्वागत उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी यांनी केले. आभार उपाध्यक्ष शंकर शिंदे यांनी मानले. सूत्रसंचालन उपाध्यक्षा सौ संगिता पाटील यांनी केले.

यावेळी कार्यकारिणी सदस्य, राज्यातील व्यापारी उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




◆ **महाराष्ट्र चेंबरच्या मुंबई येथील कौशल्य विकास केंद्रासाठी प्रसिध्द उद्योजक व बेदमुथा इंडस्ट्रीज चे चेअरमन के. आर. बेदमुथा यांनी ५१ लाख रू. ची देणगी जाहीर केली. याबद्दल कंपनीचे संचालक विजय बेदमुथा व अजय बेदमुथा यांचा मंत्री महोदयांच्या हस्ते सत्कार करणेत आला.**




◆ राजस्तरीय कौशल्य विकास परिषदेत मार्गदर्शन करतांना अध्यक्ष ललित गांधी समवेत व्यासपीठावर कौशल्य विकास व नवउद्योजकता मंत्री नाम. मंगलप्रभात लोढा व इतर मान्यवर








◆ कौशल्य विकास व नवउद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा व महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह स्विकारतांना वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, उपाध्यक्ष शंकर शिंदे, उपाध्यक्षा सौ. संगिता पाटील, उपाध्यक्ष रमाकांत मालू, उपाध्यक्ष दिलीप गुप्ता






◆ कौशल्य विकास व नवउद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा व महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह स्विकारतांना उपाध्यक्ष श्रीकृष्ण परब, व्यवस्थापन समिती निमंत्रित सदस्य कांतीलाल चोपडा, उत्तर महाराष्ट्र शाखा को चेअरमन पदाचे नियुक्ती पत्र स्विकारतांना संजय राठी, बीएसईच्य प्रमुख नियंत्रक अधिकारी के. कमला








◆ कौशल्य विकास व नवउद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा व महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते चीफ पेट्रोन सभासद आसावरी देशमुख, सर्जेराव नलावडे, रौनक शहा, शैलेश नायर. उत्तम शहा यांचा सन्मानचिन्ह देवुन सत्कार करण्यात आला

MACCIA 100
GLORIOUS 95 YEARS - MARCHING TOWARDS CENTENARY
Apex Chamber of the State
1927-2027
MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE



# ॥ सन्मानपत्र ॥

## मान. नाम. उदयजी सामंत

उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य


महाराष्ट्राच्या उद्योग जगताच्या आ'सामंता'तील 'रवि "किरणां'चा हा 'उदय' सर्वांना प्रकाशमान करत आहे याचा विशेष आनंद आहे.

महाराष्ट्रातील उद्योजक जागतिक स्पर्धेत सक्षम होण्यासाठी आपण करीत असलेले प्रयत्न आम्हा उद्योगजकांना विशेष कौतुकास्पद आणि अभिमानास्पद वाटतात म्हणूनच अत्यंत आनंदाने, कौतुकाने आणि अभिमानाने "महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अँग्रीकल्चर" तर्फे राज्यातील समस्त उद्योग व्यापार जगताच्या वतीने हे 'सन्मानपत्र' आपणास प्रदान करण्यात येत आहे.

**ललित गांधी**




◆ राज्याच्या उद्योगक्षेत्रातील अतुलनीय कामगिरीबद्दल उद्योगजगताच्या वतीने महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे उद्योगमंत्री उदय सामंत यांना ललित गांधी यांच्या हस्ते मानपत्र देऊन त्यांचा जाहीर नागरी सत्कार करणेत आला. सोबत वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, आशिष पेडणेकर, रमाकांत मालु, दिलीप गुप्ता






◆ **कौशल्य विकास व नवउद्योजकता मंत्री नाम. मंगलप्रभात लोढा यांचा सन्मानपत्र देऊन सत्कार करताना अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, शंकर शिंदे**




◆ **महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर व भारत सरकारच्या वाणिज्य मंत्रालय अंतर्गत व्यापार विभागाच्या 'ओएनडीसी' मधील सामंजस्य कराराची प्रत सादर करताना अध्यक्ष ललित गांधी आणि ओएनडीसी चे वरिष्ठ उपाध्यक्ष ऋषिकेश मेहता व्यासपीठावर उपस्थित वरिष्ठ उपाध्यक्ष ऋषिकेश मेहता व महाराष्ट्र चेंबर चे सर्व व्यवस्थापन समिती सदस्य.**

भारत सरकारच्या वाणिज्य मंत्रालय अंतर्गत व्यापार विभागाच्या 'ओएनडीसी' (Open Network for Digital Commerce) हि ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म यंत्रणा आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड ॲग्रिकल्चर यांच्या मध्ये भारत सरकारच्या ओएनडीसी विभागातर्फे आयोजित विविध प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र चेंबरने भारत सरकारच्या या विभागाबरोबर सामंजस्य करार केला आहे.

महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री श्री उदयजी सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत या महत्वपूर्ण अश्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. महाराष्ट्र चेम्बर चे अध्यक्ष ललित गांधी आणि ONDC चे वरिष्ठ उपाध्यक्ष ऋषिकेश मेहता यांची करारावर स्वाक्षरी केल्या.या वेळी ओएनडीसी(ONDC)चे महाराष्ट्र प्रमुख धीरज कुमार तसेच महाराष्ट्र चेंबर चे इतर सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

ओएनडीसी च्या प्रचारासाठी राज्यभर प्रचार मोहीम राबविण्यात संदर्भात प्रामुख्याने चर्चा करण्यात आली. या प्रसंगी बोलताना वरिष्ठ उपाध्यक्ष ऋषिकेश मेहता म्हणाले कि, ९८ वर्षांचा वैभवशाली इतिहास असणाऱ्या संस्थेसोबत काम करायला मिळाले हे आम्ही आमचे भाग्य समजतो. महाराष्ट्र चेंबरने विविध क्षेत्रातील उद्योग वाढीसाठी महत्वाची भूमिका बजावली आहे.



◆ **सामंजस्य कराराप्रसंगी मार्गदर्शन करताना जछऊ चे वरिष्ठ उपाध्यक्ष ऋषिकेश मेहता व्यासपीठावर उपस्थित चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी व महाराष्ट्र चेंबर चे सर्व व्यवस्थापन समिती सदस्य.**

रिटेल इंडस्ट्रीवर विदेशी ई-कॉमर्स कंपन्यांच्या आक्रमणाला तोंड देण्यासाठी भारत सरकारच्या या प्लॅटफॉर्मचा प्रभावी वापर व्यापाऱ्यांच्या मार्फत व्हावा, विशेषत: संपूर्ण महाराष्ट्रात, डिजिटल क्षेत्रात उद्योगांना ऑनबोर्ड करून या मिशनमध्ये आणखी योगदान मिळावे यासाठी महाराष्ट्र चेंबर सोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे

# भारत २०३० पर्यंत जागतिक स्तरावार अप्पर-मध्यम उत्पन्न असणारा तर २०५० पर्यंत अमेरिका, जपान, इंग्लैंड या सारख्या उच्च उत्पन्न असणारा देश बनेल

## नीती आयोगाचे सदस्य डॉ. अरविंद वीरमणी यांचे प्रतिपादन

### नीती आयोगाचे सदस्य डॉ. अरविंद वीरमणी यांची महाराष्ट्र चेंबरला भेट
### डॉ. अरविंद वीरमणी यांचा निर्यातदार, व्यापारी, उद्योजकसमवेत वार्तालाप





◆ **महाराष्ट्र चेंबर च्या भेटी प्रसंगी केंद्रिय राज्यमंत्री दर्जा असलेले व नीती आयोगाचे (दिल्ली) सदस्य डॉ. अरविंद वीरमणी मार्गदर्शन करताना व्यासपीठावर उपस्थित महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी व वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र माणगावे समोर उपस्थित निर्यातदार, उद्योक व व्यापारी.**

मुंबई : केंद्रिय राज्यमंत्री दर्जा असलेले व नीती आयोगाचे (दिल्ली) सदस्य डॉ. अरविंद वीरमणी यांनी नुकतीच महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड ॲग्रिकल्चरच्या मुख्यालयास भेट देऊन निर्यातदार, उद्योजक, व्यापारी यांच्याशी संवाद साधून निर्यातीसंदर्भातील तसेच व्यापार उद्योगासंदर्भातील सद्यस्थितीत असलेल्या विविध पॉलिसी तसेच समस्या यांचे निराकरण करण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींचा आढावा घेतला. तसेच विकसित भारत या संकल्पनेला अधिक बळ देण्यासाठी केंद्र शासनाला निर्यात वृद्धी, व्यापार, उद्योग क्षेत्राला बळकटी देण्यासाठी आवश्यक अशा सुचना तसेच नवीन ध्येयधोरणे याचा








◆ **महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी व वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र माणगावे यांनी डॉ वीरमणी यांना शाल, पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला तसेच महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली. राज्यातील व्यापार उद्योग वाढीसंदर्भांत विविध मागण्यांबाबत निवेदन दिले.**



◆ **केंद्रिय राज्यमंत्री दर्जा असलेले व नीती आयोगाचे (दिल्ली) सदस्य डॉ. अरविंद विरमणि यांच्या समवेत अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र मानगावे, उपाध्यक्ष सर्वश्री शंकर शिंदे, दिलीप गुप्ता, करुणाकर शेट्टी, संजय सोनावणे आणि सौ. संगीता पाटील**

अंतर्भाव करण्यासाठी केंद्र शासनाला सल्ला देणार असल्याचे डॉ. अरविंद वीरमणी यांनी नमूद केले.

याप्रसंगी विकसित भारत २०२७ या दृष्टिकोनातून केंद्र शासन राबवित असलेल्या विविध योजना याविषयी सुद्धा माहिती डॉ. अरविंद वीरमणी यांनी उपस्थितांना दिली. तसेच विविध क्षेत्रातील कृषी, टेक्सटाईल, कृषी प्रक्रिया, शिक्षण क्षेत्र या संदर्भात काम करणारे निर्यातदार, व्यापारी, उद्योजक सहभागी झाले होते.

यावेळी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी व वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र माणगावे यांनी डॉ वीरमणी यांना शाल, पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देवून सत्कार केला. महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली. राज्यातील व्यापार उद्योग वाढीसंदर्भात विविध मागण्यांबाबत निवेदन दिले. अध्यक्ष ललित गांधी यांनी डॉ. अरविंद विरमानी यांचा परिचय करून देतांना सांगितले की, मागील २० वर्षांपासून केंद्र शासनाच्या विविध समित्यांवर काम करत असून आयात निर्यात, आर्थिक क्षेत्रासंदर्भात ध्येयधोरणे ठरविण्याबाबत विशेष भूमिका पार पाडत आहेत. त्यांचे ६० हुन अधिक विविध विषयावर पुस्तके व लेख प्रसिद्ध झाले आहेत. ट्राय, फिक्की, सेबी या संघटनांचे सल्लागार म्हणून त्यांनी काम पाहिले असल्याचे सांगितले.

चेंबरच्या के. आर. वेदमुथा सभागृहात संपन्न झालेल्या या कार्यक्रमाचे सूत्र संचालन उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी यांनी केले. याप्रसंगी उपाध्यक्ष सर्वश्री संजय सोनवणे, दिलीप गुप्ता, शंकर शिंदे, सौ. संगीता पाटील, विश्वस्त आशिष पेडणेकर यांच्यासह बेदमुथा इंडस्ट्री चे एमडी अजय वेदमुथा, महाराष्ट्र शासनाच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे सभासद प्रसन्न देशपांडे, चीफ पेट्रोन व युवा उद्योजक कमिटी चेअरमन आश्विन परदेशी, MSME कमिटीचे चेअरमन हितेश मोता, कृषी आणि ग्रामविकास समितीचे चेअरमन राजाराम सांगळे, कृषि फूडचे वासुदेव भगत, एडिएफ फूड चे सीएफ़ओ शार्दूल जोशी, ऑल इंडिया इम्पोर्ट एक्सपोर्ट एसोसिएशन चे पंकज व्होरा, पार्ले या जगविख्यात कंपनीचे इंटरनेशनल व्यापर पाहणारे समीर प्रभुदेसाई, आसाम मधील बाम्बू उत्पादक संघटनाचे सिद्धार्थ व दिव्या मुनोत, बॉम्बे मेटल एक्सचेंज चे अध्यक्ष संदीप जैन, देवकर यार्न चे प्रितेश देवकर, अमित कॉटन चे एमडी सुमित चौधरी, निलेश घरत, मानसी खानोलकर,तसेच आयात-निर्यात संबंधित व्यवसायिक, उद्योजक व उत्पादन क्षेत्राशी निगडित उद्योजक, लॉजिस्टिक्स क्षेत्राशी निगडित व्यावसायिक यांच्या सोबत डॉ. अरविंद वीरमणी यांनी विविध विषयांवर वार्तालाप केला.



◆ **सोलापूर जिल्हा स्तरीय व्यापार-उद्योग परिषद प्रसंगी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, केतन शहा समोर उपस्थित सोलापूर जिल्ह्यातील व्यापारी व उद्योजक आदि.**

# उड्डाणसेवा सुरू होताच आयटीसह इतर कंपन्या येणार; ३००० कोटींचा इलेक्ट्रॉनिक उद्योग आणण्याचा प्रयत्न : ललित गांधी

## पहिली विमानसेवा पूणे, हैदराबाद, तिरुपती, गोवाकरिता सुरू होणार : इंडिगो, स्टार एअर, फ्लाय ९१ या विमान कंपन्यांसोबत चर्चा सुरू

सोलापूर शहरातून लवकरच विमानसेवा सुरू होणार आहे. विमानसेवा सुरू करण्यासाठी इंडिगो, स्टार एअर, फ्लाय ९१ या तीन विमान कंपन्यांसोबत चर्चा सुरू आहे. यांच्याकडून विमानसेवा सुरू होईल. पहिल्या टप्प्यात हैदराबाद, तिरुपती, गोवा या तीन ठिकाणी विमानसेवा सुरू होईल. ही सेवा सुरू होताच प्राधान्याने आयटी कपंन्या येतील, नंतर तीन हजार कोटींचे इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग उद्योग सुरू करण्याचा प्रयत्न असणार, अशी माहिती महाराष्ट्र चेंबर ऑफ चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली. जिल्ह्याचा विकास आराखडा बनवून त्याची अंमलबाजवणी करण्यासाठी डिस्ट्रिक्ट डेव्हलपमेंट फोरमची स्थापना करण्याची घोषणा यावेळी करण्यात आली. उद्योजक यांची राज्यव्यापी औद्योगिक परिषद सप्टेंबर मध्ये पुण्यात होणार आहे, असेही श्री गांधी म्हणाले, यावेळी सोलापूर इंडस्ट्रीयल असोसिएशनचे अध्यक्ष राम रेड्डी, सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी, महाराष्ट्र कंत्राटदार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष मिलींद भोसले, केतनभाई शहा यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.

इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग उद्योगासाठी २५० एकर जागा लागणार आहे. यासाठी सुमारे ३ हजार कोटींची गुंतवणूक



◆ **महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांचा सत्कार करताना केतन शहा, यावेळी उपस्थित राजू राठी, उज्ज्वल कोठारी, केतन वनकुद्रे आदी**

आहे. याच्या पायाभूत सुविधासाठी

शासनाकडून ८० कोटींचे अनुदान आहे. हा उद्योग राष्ट्रीय महामार्ग लगत उभा करायचा आहे. सोलापूर जिल्ह्यात २५० एकर जागेचा शोध सुरू आहे. तसेच विमानसेवा सुरू होताच आयटी कंपन्या तर येतीलच शिवाय सोलार संबंधित व्यवसाय, इलेक्ट्रिकल वाहनांशी संबंधित व्यवसाय सुरू होतील. यातून इतरही उद्योग सुरू होऊ शकतात, त्यासाठी आमचा प्रयत्न असणार आहे, अशी माहिती श्री. गांधी यांनी दिली,

# सोलापूर जिल्हास्तरीय व्यापारी परिषद





◆ **सोलापूर जिल्हास्तरीय व्यापारी परिषद चे उद्‌घाटन करताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज चे नूतन संचालक केतन शहा, प्रितेश शहा, नवीन गोयल, संदीप शहा आणि संजीव पाटील, सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी आदि पदाधिकारी**

**सोलापूर :** दिनांक १८ ऑगस्ट २०२४ रविवार रोजी एपीएमसी मधील व्यापाऱ्यांच्या विविध अडचणी बाबत सोलापूर जिल्ह-स्तरीय व्यापारी परिषद आयोजित करण्यात आले होते. सदर परिषदेत दीप प्रज्वलन करून परिषदेचे उद्घाटन करण्यात आले.

सदर परिषदेचे अध्यक्ष महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज चे अध्यक्ष श्री ललित गांधी अध्यक्ष स्थानी होते. सदर परिषदेचे प्रास्ताविक भुसार आडत व्यापारी संघाचे अध्यक्ष सुरेश चिक्कळी यांनी केले प्रास्ताविकेत एपीएमसी कायदा रद्द व्हावा यासाठी अनेक वर्षापासून चालू असलेल्या लढ्याचे व एपीएमसीच्या बाबतीतल्या अडचणीचे माहिती सांगितले सदर व्यापारी परिषदेत विश्वेश्वर भिंगे पंढरपूर, सिद्धय्यास्वामी हिरेमठ सोलापूर, सिताराम गुप्ता, आयुब कल्याणी, रेवणसिद्ध आवजे यांनी आपली मते मांडली.

सदर व्यापारी परिषदेत फामचे अध्यक्ष जितेंद्रभाई शहा, ग्रोमाचे अध्यक्ष श्री भिमजी भानुशाली, पुना मर्चट चेंबरचे महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीचे समन्वयक श्री राजेंद्र बाठीया, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहुन उपस्थित व्यापाऱ्यांना मार्गदर्शन केले. सदर परिषदेत अध्यक्षीय भाषणात संबोधताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे श्री ललित गांधी यांनी व्यापाऱ्यांनी आपली एकजूट कायम ठेवावी, संघटन शक्ती वाढवावे, संघटन शक्तीला पर्याय नाही, तेंव्हा आपण आपले आपसातील मतभेद विसरून महाराष्ट्रातील सर्व प्रकारचे व्यापार करणारे व्यापाऱ्यांनी एकत्रित यावे आणि आपला दिनांक २७ ऑगस्ट २०२४ रोजीचा महाराष्ट्र राजव्यापी एक दिवसाचा लक्षणीक बंद यशस्वी करावा असे आग्रहाची विनंती या परिषदेत केले

सदर कार्यक्रमास फाम कडून प्रितेश शहा, पुना मर्चंट चेंबरचे नवीन गोयल, संदीप शहा आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज चे नूतन संचालक केतन शहा, संजीव पाटील, सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी तसेच पंढरपूर, मंगळवेढा, बार्शी, वैराग, अक्कलकोट, दुधनी, करमाळा, सांगोला, मोडनिंब, कुरूडवाडी, अकलूज, सोलपूर जिल्ह्यातील अनेक व्यापारी संघटनेचे प्रमुख व व्यापारी मोठ्या संख्येने या परिषदेत उपस्थित होते. सदर व्यापारी परिषदेस दि सोलापूर ऑइल मिल ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष महालिंगप्पा परमशेट्टी, दि सोलापूर कॅन्व्हासिंग एजंट्स असोसिएशनचे अध्यक्ष श्रीशैल अंबारे, कस्तुरबा भाजी मंडई असोसिएशनचे उपाध्यक्ष रेवणसिद्ध आवजे, राणी लक्ष्मीबाई भाजी मंडई व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष रियाज बागवान, मिरची असोसिएशनचे अध्यक्ष आयुब कल्याणी, बारदाना व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष मल्लिनाथ कटप, किराणा व मसाला व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष प्रवीण ओसवाल भुसार आडत व्यापारी संघाचे उपाध्यक्ष अशोककुमार संकलेचा, सेक्रेटरी वैभव बरबडे, खजिनदार गुरुशांत ढंगे, सल्लागार संगमेश्वर रघोजी, प्रभाकर विभूते, संचालक बसवराज इटकळे, वस्तीमल संकलेचा, महादेव मठपती, राजानंद शिंदे, रहीम मैंदर्गीकर, प्रकाश हत्ती, शिवानंद उपासे, प्रवीण नष्टे, आशिष दुलंगे, सिद्धराम उमदी, विनय दुलंगे, गिरीश भिमपुरे, बाळू पटेल, मल्लिनाथ निम्बर्गी, श्रीशैल कुंभार, संजीवकुमार स्वामी, पिंटू शेटे, आकाश पटेल, सिद्धलिंग नरोणे, धनराज यादवाड, संगमेश्वर पुराणीक आदि सह अनेक व्यापारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# उद्योगमंत्र्यासमवेत बैठक घेऊन औद्योगिक वसाहतीचे प्रश्न मार्गी लावू : ललित गांधी







**सोलापूर :** लवकरच उद्योग मंत्री उदयजी सामंत यांच्यासमवेत मिटींग घेऊन त्यांच्याशी चर्चा करुन येथील औद्योगिक वसाहतीचे प्रश्न मार्गी लावू, असे आश्वासन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिले.

दि सोलापूर इंडस्ट्रीयल को-ऑप इस्टेट सोसायटी लिमिटेड सोलापूर येथे उद्योजकांशी संवाद साधताना त्यांनी हे आश्वास दिले. सुरुवातीस संस्थेचे चेअरमन मकरंद गवळी यांनी श्री ललित गांधी, सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरचे नुतन पदाधिकारी केतन शहा व संजीव पाटील यांचा सत्कार केला. औद्योगिक वसाहतीचे चेअरमन श्री मकरंद गवळी यांनी प्रामुख्याने येत असलेल्या अडी-अडचणी मांडल्या त्याबाबत मुलभूत पायाभूत सुविधा म्हणजे रस्ते व ड्रेनेज यासंबंधी अडचणी मांडल्या तसेच महाराष्ट्र राज्य शासनाचे सुधारित परिपत्रकेत बांधकाम परवानगी घेणे याबाबत अडचणी सांगितल्या. तसेच उद्योजक घनश्याम चव्हाण व शैलेश डागा यांनी सेवा उद्योग संदर्भात आपल्या अडचणी मांडल्या.

या कार्यक्रमास औद्योगिक वसाहतीचे संचालक प्रकाश जम्मा, श्रीनिवास सादूल, हर्षवर्धन कंडारकर, अतुलसिंग राजपूत तसेच उद्योजक अनिल पाटील, चेतन वनकुद्रे, गोविंद पटेल, अनिल खमितकर, श्री मोकाटे, जयंत गोरटे, सुनिल अग्रवाल, मनोज अग्रवाल, प्रितिश कुलकर्णी, गणेश सट्टे, चंद्रकांत डरंगे, नेमेश वनकुद्रे आदी उपस्थित होते.

# E-commerce Export Workshop



On August 7th, 2024, the MSME-Development and Facilitation Office (MSME-DFO) in Mumbai hosted a highly successful E-commerce Export Workshop, inaugurated by Shri Milind Barapatre, Joint Director and Head of Office. The event featured Shri Lalit Gandhi, President of the Maharashtra Chamber of Commerce, Industry, and Agriculture (MACCIA), as the esteemed Chief Guest. A distinguished panel of experts from the Directorate General of Foreign Trade (DGFT), Federation of Indian Export Organisations (FIEO), District Industries Centre (DIC), NSIC- National Small Industries Corporation (NSIC), and MSME-DFO Mumbai shared their insights, making the programme a resounding success. The workshop, attended by over 125 participants, aimed to raise awareness about e-commerce, export opportunities, and the Ministry of MSME's schemes and programmes, that aims to benefit the MSMEs and Exporters. Shri S. R. Khujnare, Asstt. Director coordinated the Even.

# 'प्राईड ऑफ इंडिया आयकॉन' या पुरस्काराने महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी सन्मानित




हेरॉल्ड ग्लोबल या आंतरराष्ट्रीय मीडिया ब्रँड तर्फे आयटीसी मराठा मुंबई येथे भव्य समारंभात प्राईड ऑफ इंडिया आयकॉन या पुरस्काराने महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर चे अध्यक्ष ललित गांधी यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी खासदार अरविंद सावंत, एम.एम.आर.डी.ए चे कमिशनर संजय मुखर्जी (IAS), मुंबई बार असोसिएशनचे अध्यक्ष नितीन ठक्कर, AIAI अध्यक्ष विजय कळंत्री यांनाही या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

तसेच यानिमित्त आयोजित विशेष समारंभात चित्रपट, करमणूक, क्रीडा क्षेत्रासह उद्योग क्षेत्रातील अग्रेसर ब्रँड्सना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.





या समारंभात पुरस्कार प्रदान करण्यासाठी मुख्य अतिथी म्हणून त्यांना आमंत्रित करण्यात आले होते. सिंगर अमित मिश्रा, एक्टर सनी हिंदुजा, चंदन रॉय संन्याल, सुनीता राजवर, जमील खान यांना त्यांचे हस्ते पुरस्कार देण्यात आले.

# मिरज औद्योगिक वसाहतीचे सर्व प्रश्न मार्गी लावू : ललित गांधी

## ललित गांधी यांची मिरज एम आयडीसी असो. ला भेट



**कुपवाड : मिरज एमआयडीसी असोसिएशनतर्फे ललित गांधी यांचा सत्कार करण्यात आला.**

**कुपवाड :** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्टीज अँड अँग्रीकल्चर या शिखर संस्थेचे नवनियुक्त अध्यक्ष ललित गांधी यांनी शुक्रवारी मिरज एमआयडीसी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी उद्योजकांशी संवाद साधत उद्योगांशी निगडीत विविध विषयांवर चर्चा केली. यामध्ये प्रामुख्याने उद्योजकांच्या विविध अडचणी विषयी राज्य सरकारशी चर्चा करून लवकरच उद्योग मंत्र्यांशी बैठक लावण्याचे आश्र्वासन ललित गांधी यांनी दिले. विनोद पाटील, संचालक दीपकबाबा शिंदे, संजय आाराणके, संजय खांबे, माधव कुलकर्णी, यशोधन फडके, अमोल काळे, रमाकांत मालू, गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य रमेश आरवाडे, अर्चना पवार, व्यवस्थापक गणेश निकम उपस्थित होते.

## व्यापारी उद्योजकांच्या विविध समस्या प्राधान्याने दूर केल्या जातील अशी ग्वाही डायरेक्टर जनरल ऑफ फॉरेन ट्रेड चे महासंचालक संतोष कुमार सारंगी



◆ **डायरेक्टर जनरल ऑफ फॉरेन ट्रेड चे महासंचालक संतोष कुमार सारंगी यांचा पुष्पगुच्छ देवुन सत्कार करताना ललित गांधी, करूणाकर शेट्टी**

महाराष्ट्र हे निर्याती मधील देशातील अग्रेसर राज्य असून या राज्यातील आयात निर्यात अशी निगडित व्यापारी उद्योजकांच्या विविध समस्या प्राधान्याने दूर केल्या जातील अशी ग्वाही डायरेक्टर जनरल ऑफ फॉरेन ट्रेड चे महासंचालक श्री संतोष कुमार सारंगी यांनी दिली महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज तर्फे श्री सारंगी यांच्या मुंबई दौऱ्याप्रसंगी अध्यक्ष ललित गांधी व उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी यांनी भेट घेऊन आंतरराष्ट्रीय व्यापार करणाऱ्या सभासदांच्या आयात निर्यातीसंबंधी विविध स्पष्ट संबंधी सविस्तर चर्चा करून निवेदन सादर केले होते.

त्याप्रसंगी ते बोलत होते आंतरराष्ट्रीय व्यापार विभागाच्या नवी दिल्ली येथील मुख्यालयामध्ये या संदर्भात लवकरच संयुक्त बैठक आयोजित करून धोरणात्मक निर्णयासंबंधीचे प्रश्न असतील सरकारच्या आयात निर्यात धोरणामध्ये करावयाच्या बदलासंबंधी मागणी असतील अशा सर्व विषयावर एकत्रित चर्चा करून प्राधान्याने सर्व समस्या दूर केल्या जातील अशी ग्वाही संतोष कुमार सारंगी यांनी याप्रसंगी दिली ललित गांधी यांनी संतोष कुमार सारंगी यांचा पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान केला

## महाराष्ट्र चेंबर व शिवाजी विद्यापीठ कौशल्य विकासासाठी संयुक्तपणे कार्य करेल - कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के

### अध्यक्ष ललित गांधी यांच्या भेटीप्रसंगी आश्वासन



◆ **कोल्हापूर शिवाजी विद्यापीठ कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांना निवेदन देताना चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, BSPP चे समन्वयक मनीष पाटील**

कोल्हापूर : नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाचे प्रत्यक्ष अनुभवाआधारीत ज्ञान मिळणे बंधनकारक आहे. यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज व शिवाजी विद्यापीठ संयुक्तपणे कार्य करेल असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी शिवाजी विद्यापीठ भेटीप्रसंगी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांची भेट घेऊन शिक्षणासोबत प्रशिक्षण, प्रत्यक्ष कार्य अनुभव यासाठी चेंबरला बिझनेस सोल्युशन पॉलीक्लीनिक (BSPP) उपक्रम याविषयी चर्चा केली त्याप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी BSPP चे समन्वयक मनीष पाटील उपस्थित होते.




**मुंबई :** MEDC चे अध्यक्ष श्री. अतुल शिरोडकर, , यांच्या नेतृत्वाखाली, MEDC यांनी २३ ऑगस्ट २०२४ रोजी सिडनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स, चर्चगेट, मुंबई येथे MEDC - MSME परिषद २०२४ चे आयोजन केले होते. सुमारे ४०० जणांनी २२ समर्थक आणि ३४ प्रतिष्ठित वक्ते यांच्या उपस्थितीने परिषदेला मोठे यश मिळाले.

संमेलनाचे उद्घाटन मान्यवर अतिथी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी व अन्य मान्यवरांच्या हस्ते झाले. या परिषदेला सन्माननीय अतिथी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष श्री. ललित गांधी उपस्थित होते.

ललित गांधी यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या कार्याची माहीती दिली. तसेच चेंबर मार्फत MSME च्या विकासाकरीता असलेले विविध उपक्रम तसेच योजनांची माहीती दिली.

स्वागतपर भाषणात अतुल शिरोडकर यांनी सर्व आदरणीय पाहुणे आणि सहभागींचे हार्दिक स्वागत केले. त्यांनी महाराष्ट्रातील आर्थिक वाढ आणि विकासाला चालना देण्यासाठी MEDC बजावत असलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर भर दिला. प्रमुख वक्ते डॉ. रजनीश कामत, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू यांनी MSME आणि कौशल्य विकासाचे महत्त्व अधोरेखित केले आणि सांगितले की, भारताने, तरुण विचारांचे राष्ट्र म्हणून, प्रगतीसाठी या प्रतिभेचा उपयोग केला पाहिजे.

प्रमुख वक्ते राजिंदर सिंग भाटिया, अध्यक्ष, सोसायटी ऑफ इंडियन डिफेन्स मॅन्युफॅक्चरर्स आणि कल्याणी स्ट्रॅटेजिक सिस्टम्स लिमिटेडचे अध्यक्ष यांनी स्टार्टअप्सच्या



◆ MEDC - MSME **परिषद २०२४ चे दिपप्रज्वलन करून उद्घाटन करताना चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी**

योगदानाला संरक्षण निर्यातीत झालेल्या वाढीचे श्रेय देऊन भारताच्या संरक्षण क्षेत्राच्या उल्लेखनीय वाढीबद्दल सांगितले.

प्रमुख वक्ते, डॉ. अपूर्वा पालकर, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचे संस्थापकीय कुलगुरू यांनी MSME क्षेत्रातील रोजगार निर्मितीच्या महत्त्वाच्या भूमिकेवर जोर देऊन मानवी भांडवल निर्मितीच्या महत्त्वावर लक्ष केंद्रित केले.

यावेळी विजय कलंत्री, अध्यक्ष, ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज; गुस्तावो गोन्झालेझ, चिलीचे कॉन्सुल जनरल; स्वित्झर्लंडचे महावाणिज्यदूत मार्टिन म्युलर् उपस्थित होते.

या परिषदेत नवोपक्रम, उद्योजकता, उष्मायन आणि कौशल्य विकास यावर होते, एमएसएमईसाठी आर्थिक संधी, एमएसएमईसाठी संरक्षण संधी या विषयावर विविध वक्तांची मार्गदर्शन भाषणे झाली.

MED
उद्घ

# ई-कॉमर्स च्या आक्रमणाला तोंड देण्यासाठी ONDC तंत्रज्ञान उपयुक्त - धीरजकुमार

## भारत सरकार व महाराष्ट्र चेंबर संयुक्त अभियान राबविणार






◆ **भारत सरकारच्या वाणिज्य मंत्रालयाअंतर्गत निर्मित ONDC चे महाराष्ट्र विभागीय प्रमुख धीरजकुमार यांना चेंबर पत्रिका देताना अध्यक्ष ललित गांधी दुसऱ्या छायाचित्रात धीरजकुमार यांच्याशी चर्चा करताना अध्यक्ष ललित गांधी**

**मुंबई** : ई-कॉमर्स व्यापारामध्ये परकीय कंपन्यांच्या आक्रमणामुळे भारतीय रीटेल व्यापारी अडचणीत येत आहे. त्याला सक्षम बनविण्यासाठी ONDC Open Network Digital Commerce हे तंत्रज्ञान वापरून छोट्या व्यापारी-उत्पादकांना आपली उत्पादने ई-कॉमर्स च्या माध्यमातुन विक्री करता येणार आहेत. त्यामुळे हे तंत्रज्ञान सर्वांनी स्विकारण आवश्यक आहे असे भारत सरकारच्या वाणिज्य मंत्रालयाअंतर्गत निर्मित ONDC चे महाराष्ट्र विभागीय प्रमुख धीरजकुमार यांनी केले.

ONDC च्या विस्तारासाठी महाराष्ट्र चेंबरने भारत सरकारबरोबर संयुक्तपणे कार्य करण्यासंबंधी चर्चेसाठी धीरजकुमार यांनी महाराष्ट्र चेंबरच्या मुख्यालयास भेट दिली त्याप्रसंगी ते बोलत होते.

चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी त्यांचे स्वागत केले व रीटेल व्यापाऱ्यांच्या अडचणी विस्ताराने मांडल्या ONDC भारत सरकार व महाराष्ट्र चेंबर संयुक्तपणे कार्य करेल अशी ग्वाही ललित गांधी यांनी याप्रसंगी दिली.



◆ **मान. उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व कौशल विकास मंत्री मान. मंगलप्रभात लोढा, आम. माधुरीताई मिसाळ यांच्या हस्ते चेंबर पत्रिकेचे अनावरण करणेत आले**

# मासिआ बिजनेस नेटवर्किंग फोरमच्या माध्यमातून पंधरवड्यात ५४ लाखाचा व्यवसाय



मासिआ बिजनेस नेटवर्किंग फोरम ची आठवी मीटिंग हॉटेल एक्सप्रेस इन नाशिक येथे पार पडली. यावेळी फोरमच्या माध्यमातून झालेल्या मागील पंधरवड्यात रू. ५४ लाखाचा व्यवसाय फोरमच्या सभासदांचा झाला असल्याची माहिती को चेअरमन श्री दत्ता भालेराव यांनी दिली. मीटिंग मध्ये आयमाचे अध्यक्ष श्री. ललित बूब यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच स्पेक्ट्रम ग्रुपचे अध्यक्ष आणि बिझनेस नेटवर्किंग फोरमचे अध्यक्ष श्री. दीपक चौधरी यांनी स्पेक्ट्रम ग्रुपमध्ये सर्वांना विविध कामे कशी मिळू शकतील याबाबत मार्गदर्शन केले.

त्याचबरोबर या ठिकाणी नवनियुक्त विविध कमिटी चेअरमन, को चेअरमन उपस्थित होते. सुरुवातीला श्री. दत्ता भालेराव यांनी चेंबरचे अध्यक्ष श्री. ललित गांधी यांनी नाशिककरांना अकरा कमिटीचे चेअरमन पद व नऊ कमिटीचे को चेअरमन पद देऊन जो विश्वास दाखवला त्याबाबत आभार मानले. तसेच अध्यक्षांचा विश्वास सार्थ करण्याबाबत सर्वांनी कामाला लागावे अशी अपेक्षा व्यक्त केली. या सर्व पदाधिकाऱ्यांना त्यांच्या कमिटीचे कामकाज व जबाबदाऱ्या समजावून सांगण्यात आल्या. तसेच आगामी कालावधीमध्ये त्यांच्या कमिटीला काय कामकाज करायचे आहे, याबाबत त्यांनी त्यांचे नियोजन सादर केले. कमिटीचे चेअरमन व को चेअरमन याचे कामकाज व जबाबदारीबाबत उपाध्यक्ष श्री. संजय सोनवणे यांनी चित्रफितीद्वारे माहिती दिली. याप्रसंगी कृषी व ग्रामविकास समितीचे चेअरमन श्री. राजाराम सांगळे यांनी समितीच्या कामकाजाबाबत त्यांचे आगामी प्लॅन्स सांगितले. मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरम समितीचे चेअरमन श्री. दीपक चौधरी यांनी सप्टेंबर महिना अखेर जळगाव, बारामती, संगमनेर संभाजीनगर आणि सांगली येथील नेटवर्क बिजनेस फोरम सुरू करणे बाबत घोषणा केली. त्याचबरोबर टुरिझम समितीचे दत्ता भालेराव यांनी त्याची समितीचे पर्यटन विकासाबाबत करायच्या कामाचे नियोजन सादर केले. माईन्स व मिनरल समितीचे चेअरमन श्री राहुल देशमुख यांनी कामकाजाची रूपरेषा समजून घेतली. उत्तर महाराष्ट्र एक्स्पोर्ट प्रमोशन समितीचे चेअरमन श्री रवींद्र झोपे, को चेअरमन राजेश मालपुरे यांनी विविध देशांशी एक्सपोर्ट करण्याबाबतच्या संधी याबाबत त्यांच्या कल्पना मांडल्या. सोलर पॉवर समितीचे चेअरमन श्री. प्रशांत जोशी, वीजदर समितीचे को चेअरमन श्री. श्रीधर व्यवहारे यांनी आपापल्या कमिटीचे कामकाजाबाबत माहिती दिली.

याप्रसंगी इन्फ्रास्ट्रक्चर समितीचे चेअरमन श्री. विजय बेदमुथा यांनी राज्यातील ६ विभागात महाराष्ट्र चेंबरचे कार्यालय सुरु करणे व प्रत्येक जिल्ह्यात कार्यालय सुरु करण्याचे प्रयत्न सुरु असल्याची माहिती दिली. तसेच क्लस्टर समितीचे चेअरमन श्री. श्रीकांत पाटील, शाखा चेअरमन अंजूभाई सिंगल, को चेअरमन श्री भावेश मानेक, मिडीया समितीचे को चेअरमन श्री. अभिजीत चांदे, एमएसएमई समितीचे राजेंद्र कोठावदे हे उपस्थित होते. ४५ उद्योजक, चेंबरचे सहायक सचिव अविनाश पाठक फोरमचे कार्यालयीन सचिव सचिन जाधव व संगमनेरचे उद्योजक उपस्थित होते.






◆ **सिम्बॉयसिस संस्थेने राष्ट्रीय मानवी संबंध परिषद २०२४ दि. १० ऑगस्ट २०२४ रोजी आयोजित केली होती. त्यावेळी मानवी संबंधांचे असणारे जीवनातील आणि खास करून व्यापार, उद्योग, आर्थिक क्षेत्रातील महत्वावर चेंबरचे उपाध्यक्ष श्री. संजय सोनवणे यांनी मार्गदर्शन केले.**

# जीएसटी व्यापार, उद्योग स्नेही करण्याचा प्रयत्न : आदित्य क्षत्रिय



◆ **कर सल्लागार आदित्य क्षत्रिय मार्गदर्शन करतांना समोर उपस्थित व्यापारी - उद्योजक आदी.**

जीएसटी कायद्यामध्ये असणाऱ्या क्लिष्टता दूर करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केंद्र सरकारने केला आहे. या विषयी अधिक माहिती व्हावी या उद्देशाने अध्यक्ष श्री ललित गांधी उपाध्यक्ष श्री संजय सोनवणे यांच्या संकल्पनेतून आयोजित कार्यक्रमात माहिती देण्यात आली, सीजीएसटी कलम १६ (४) जे पत्रके भरण्यासंदर्भात आहे त्याचा निर्देश करावा लागतो. त्यानुसार सन २०१७ पासून ते २०२१ पर्यंतच्या पत्रकासंदर्भातील तरतूद महत्वाची आहे. तसेच नवे कलम ७४ (अ) नुसार जर काही कर कमी भरला गेला असेल अथवा भरला गेला नसेल तर तो ठराविक मर्यादेत भरल्यास दंड लागणार नाही अशीही तरतूद केली आहे.

अपिलाच्या दृष्टिकोनातून जी आगाऊ अनामत रक्कम भरावी लागते त्याबाबतही काही कमी रक्कम भरण्याची सवलत आहे. परंतु काही नव्या तरतुदींमुळे क्लिष्टता वाढूही शकते हे लक्षात घेता व्यापारी, उद्योजक आणि करदात्यांनी काळजीपूर्वक व्यवहार करणे आवश्यक आहे असा सल्ला कर सल्लागार आदित्य क्षत्रिय यांनी दिला. ते महाराष्ट्र चेंबरतर्फे आयोजित जीएसटी करातील बदल चर्चासत्रामध्ये मार्गदर्शक वक्ते म्हणून बोलत होते.

CGST कायदा व IGST कायदा यामध्ये बदल व सुधारणा काय करण्यात आल्या आहेत याची माहिती चित्रफितीद्वारे देऊन त्याचा व्यापार उद्योग क्षेत्रावर होणार परिणाम याचे चित्रफितीद्वारे तज्ञ कर सल्लागार आदित्य सीमा प्रदिप क्षत्रिय याचे मार्गदर्शन केले. उदाहरणासह काय काळजी घेतली पाहिजे याची माहिती दिली.




**कर सल्लागार आदित्य क्षत्रिय यांचा सत्कार करतांना अंजु सिंघल, श्री. भावेश माणेक, श्री. सुरेश चावला.**

सुरवातीला निमंत्रित सदस्य भावेश मानेक यांनी स्वागत व तज्ञ कर सल्लागार आदित्य सीमा प्रदिप क्षत्रिय यांचा परिचय करून दिला. निमंत्रित सदस्य अंजु सिंघल यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक कार्यकारीणी सदस्य सुरेश चावला यांनी केले. चर्चासत्रास कार्यकारिणी सदस्य मोहनलाल लोढा, दत्ता भालेराव, मिलिंद राजपूत, राजेंद्र कोठावदे, सुमित मंडलेचा, रमेश तांबे, निखिल जोशी, हर्ष त्रिपाठी, चिरायू भंडारी, सल्लागार दिलीप साळवेकर, सहायक सचिव अविनाश पाठक, सचिन जाधव आदि उपस्थित होते.

# नंदुरबार येथे कौशल्य विकास केंद्र सुरु करण्यासाठी सहकार्य करण्याचे विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांचे आश्वासन



नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रविण गेडाम यांना निवेदन देतांना उपाध्यक्ष संजय सोनवणे, कार्यकारीणी सदस्य राजाराम सांगळे, दत्ता भालेराव, नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांची महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष संजय सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने भेट घेतली. याप्रसंगी नाशिकसह उत्तर महाराष्ट्रात कौशल्य विकास केंद्र सुरु करणे कौशल्य विकासासाठी उपक्रम आयोजित करण्यासंदर्भात सकारात्मक चर्चा झाली. केंद्रिय कौशल्य विकास आणि उद्योजकता सचिव अतुलकुमार तिवारी, महाराष्ट्र राज्याच्या कौशल्य विकास विभागाच्या आयुक्त निधी चौधरी, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या उपस्थित झालेल्या समन्वय बैठकीत आदिवासी जिल्हा असलेल्या नंदुरबार येथे कौशल्य विकास केंद्र सुरू करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली होती. नंदुरबार येथे तेथील व्यापार, उद्यो गांना कुशल मनुष्यबळ उपलबद्ध करून देण्यासाठी कौशल्य विकास केंद्र सुरु करण्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी शिष्टमंडळाला दिले.

उपाध्यक्ष संजय सोनवणे यांनी नंदुरबार व उत्तर महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील कृषी, उद्योग, व्यापार याची माहिती देऊन व्यापार उद्योगांना आवश्यक असलेले मनुष्यबळासाठी कौशल्य विकास केंद्र स्थापन करणे व कौशल्य विकास उपक्रम सुरु करणे आवश्यक असून महाराष्ट्र चेंबरने अध्यक्ष ललित गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु केलेल्या कौशल्य विकासाच्या उपक्रमांची माहिती दिली. महाराष्ट्र चेंबर विविध क्षेत्रातील तज्ञ समित्या असून त्या समित्यांमधील तज्ञ तरुणांना कौशल्य विकासाच्या दृष्टीने मार्गदर्शन करतील असे सांगितले. कार्यकारीणी सदस्य राजाराम सांगळे यांनी नंदुरबार जिल्ह्यात मिरचीसह कृषी उत्पादनावर प्रक्रिया करणे, पॅकेजिंग, मार्केटिंग यासह विविध प्रशिक्षण तेथील तरुणांना देणे आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच कार्यकारीणी सदस्य दत्ता भालेराव यांनी पर्यटनाच्या दृष्टीनेही नंदुरबार जिल्ह्यात चांगला वाव असून पर्यटन उद्यो गाला प्रोत्साहन देणे गरजेचे असल्याचे सांगितले.

शिष्टमंडळात महाराष्ट्र चेंबरचे कार्यकारीणी सदस्य राजाराम सांगळे, दत्ता भालेराव, सहायक सचिव अविनाश पाठक उपस्थित होते

# कर समस्या सोडविण्यासाठी व्यापारी उद्यो जकांसमवेत सभा घेणार जितेंद्र व्ही. पाटील, सहआयुक्त, राज्यकर, नाशिक विभाग



नाशिक विभाग राज्यकर सहआयुक्त श्री. जितेंद्र व्ही. पाटील यांची महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष संजय सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने भेट घेऊन त्यांचे नाशिकमध्ये स्वागत केले. यावेळी राज्यकर सहआयुक्त श्री. जितेंद्र व्ही. पाटील यांनी उत्तर महाराष्ट्रात व्यापारी उद्यो जकांच्या संयुक्त सभा घेणे व राज्यकर विभागाच्या अडचणी सोडविण्यास प्राधान्य देण्यात येईल दर महिन्याला अथवा दोन महिन्यातून एकदा सभा घेण्याचे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.

याप्रसंगी उपाध्यक्ष संजय सोनवणे यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती दिली. तसेच कर खाते व महाराष्ट्र चेंबरच्या संयुक्त विद्यमाने नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार, अहमदनगर येथे संयुक्त सभा घेणे, पूर्वी दर तीन किंवा सहा महिन्यातून एकदा व्यापारी, उद्यो जक संघटनांसह बैठक आयोजित करण्यात येत असल्याचे सांगितले. त्यातून स्थानिक समस्या सुटत असे. यासह व्यापारी, उद्यो जक, बिल्डर यांच्या अडचणी बाबत माहिती दिली. याप्रसंगी चर्चेत कार्यकारिणी सदस्य सुरेश चावला, सचिन शहा, सत्यजित महाजन, रणजितसिंग आनंद, स्वप्निल जैन, भावेश मानेक, कर सल्लागार प्रदिप क्षत्रिय सहभागी झाले. सहायक सचिव अविनाश पाठक उपस्थित होते.

# यशस्वी व्यापारोद्योगासाठी निवड आणि नितीमत्ता महत्वाची : राजेंद्र सावंत




◆ आंतरराष्ट्रीय किर्तीचे उद्योजक आणि उद्योगगुरु श्री. राजेंद्र सावंत यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करतांना महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष संजय सोनवणेसमवेत दादासाहेब गांगुर्डे, कार्यकारिणी सदस्य संदिप सोमवंशी, दिलीप साळवेकर, सचिन शहा, सौ. सोनल दगडे, स्वप्निल जैन.

आपला व्यापार किंवा उद्योग अथवा व्यवसाय यामागील मूलभूत तत्वे एकसमान असतात. परंतु त्यामध्ये काळानुरुप बदलही होतात. अशा बदलांचा मागोवा घेत नितीमता, निष्ठा आणि नाविन्य या त्रिसूत्रीवर आपले व्यवहार करण्यातून निश्चित स्वरूपाचे यश मिळते असे विचार आंतरराष्ट्रीय किर्तीचे उद्यो जक आणि उद्यो गगुरु श्री. राजेंद्र सावंत यांनी व्यक्त केले.

व्यापार उद्यो गात शॉर्टकट घेतल्यास तो आपल्यालाच कटशॉर्ट करतो हे नेहमी लक्षात ठेवले पाहिजे म्हणून कोणताही व्यवसाय असला तरी त्यात संपूर्ण क्षमतेने, विचाराने आणि सातत्याने आपली वाटचाल आत्मविश्वासपूर्वक ठेवावी असाही सल्ला त्यांनी दिला. ते महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या वतीने आयोजित भविष्यसिद्ध व्यवसाय करा मार्गदर्शन सत्रात बोलत होते. अध्यक्षस्थानी चेंबरचे उपाध्यक्ष श्री. संजय सोनवणे हे होते.

# उत्तर महाराष्ट्र विकासासाठी राज्यपालांचा सकारात्मक प्रतिसाद



महाराष्ट्र राज्य हे ज्या काही जिल्ह्यामुळे व प्रदेशामुळे देश आणि जागतिक पातळीवरही ओळखले जाते त्यामध्ये नाशिक आणि उत्तर महाराष्ट्रातील धुळे, जळगाव, नंदुरबार, अहमदनगर यामधील वैशिट्यपूर्ण अशा कृषी उत्पादनांसाठी ओळखले जाते. नाशिकसारख्या परिसरातून विविध उद्यो गांच्या जडणघडणीमुळे विकासालाही चालना मिळाली आहे. परदेशी गुंतवणूकीचेही या विभागातील प्रमाण लक्षणीय आहे. उत्तर महाराष्ट्राचे मुख्यालय नाशिक येथील विकासाची झेप लक्षात घेता एकूणच व्यापार उद्यो गाच्या दृष्टीने येथील पायाभूत सुविधांचे जाळे उत्तमरीत्या विकसित होण्याची गरज असून त्यासाठी महाराष्ट्र चॅबर प्रयत्न करीत आहे. यासर्व प्रयत्नांची दखल घेऊन त्यावर तातडीने कार्यवाही व्हावी यासाठी महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. सी. पी. राधाकृष्णन यांची भेट महाराष्ट्र चेंबरच्या वतीने उपाध्यक्ष संजय सोनवणे यांनी घेऊन एक निवेदन त्यांस सादर केले. उत्तर महाराष्ट्राचा विकास व विविध समस्या याबाबत चर्चा करून निवेदन दिले. राज्यपाल सिटी राधाकृष्णन यांनी उत्तर महाराष्ट्र व नाशिकच्या विकासाच्या दृष्टीने माहिती जाणून घेतली व सकारात्मक प्रतिसाद निवेदनात दिलेल्या मागण्याबाबत कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

प्रमुख मागण्या या निवेदनाद्वारे निफाड येथील ड्रायपोर्ट व तेथील सॉर्टीग, ग्रेडिंग, पॅकिंग, कोल्ड स्टोरेज आदी सुविधा याबाबत लगेच कार्यवाही व्हावी असे सुचविण्यात आले. याखेरीज नाशिक पुणे रेल्वे मार्ग, मनमाड इंदूर रेल्वे मार्ग, चेन्नई नाशिक सुरत रेल्वे मार्ग, निफाड ड्रायपोर्ट ते वाढवण बंदर सहा पदरी मार्ग, आणि निर्यात दृष्टिकोनातून गोंदे समृद्धी असा महामार्ग व्हावा अशा मागण्या करण्यात आल्या. यावेळी झालेल्या चर्चेमध्ये नाशिकच्या एकूणच व्यापार औद्यो गिक प्रगतीच्या दृष्टीने राज्यपालांशी चर्चा झाली आणि त्याला त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

# व्यापार उद्योगात विधी साक्षरता आणि अर्थ साक्षरता प्राणभूत महाराष्ट्र चेंबरतर्फे आयोजित परिसंवादात तज्ञांचे प्रतिपादन




कोणताही व्यापार, व्यवसाय आणि उद्योग याला अनेक कायदे लागू असतात आणि त्यांचे सतत पालन करावे लागते. परंतु सूक्ष्म आणि लघु उद्योग क्षेत्रातील व्यापारामध्ये वन मन शो असतो. त्यामुळे सर्व लक्ष हे फक्त व्यापार करण्यावर केंद्रित केले जाते. परंतु प्रत्येक उद्यो जकाने आणि व्यापाऱ्याने महत्वाच्या कायद्यातील तरतुदी जाणून घेऊन त्यानुसार व्यवहार केले तर केवळ वर्तमानातच नाही भविष्यातही त्याला कोणताही कायदेशीर असा त्रास होत नाही असे प्रतिपादन ॲडव्होकेट नीरज जकातदार यांनी केले. करारांचा कायदा, भागीदारी कायदा, एमएसएमइडी कायदा, ग्राहक संरक्षण कायदा, कामगार कायदे, निगोशिएबल इंस्ट्रुमेंट्स ॲक्ट याअनुषंगाने स्वदाहरण माहिती देऊन चर्चा करतांना त्यांनी, या कायद्यांमधून जे हक्क व्यापारी व उद्यो जकाला मिळाले आहेत व जी कर्तव्ये पार पडायची आहेत याचे त्यांनी नेहमी भान ठेवले पाहिजे, प्रतिपादन केले. व्यवहारातील छोट्याशा दुर्लक्षामुळे खूप मोठा फटका बसू शकतो याकडे लक्ष वेधून त्यांनी कायदेविषयक जबाबदाऱ्या पालन करतांना आवश्यक असे मार्गदर्शन नेहमी घ्यावे असे सांगितले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चरतर्फे शनिवार दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी सौर उद्यो जकांसाठी व्यवसायातील कायदेशीर बाबी व अर्थसक्षारता या विषयावर आयोजित परिसंवाद ते बोलत होते.

रिन्यूएबल एनर्जी समितीचे को-चेअरमन प्रशांत जोशी यांनी स्वागत करून प्रास्ताविक केले. उपाध्यक्ष संजय सोनवणे यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती देऊन मार्गदर्शन करतांना रिन्यूएबल एनर्जीच्या बाबतीत केंद्र व राज्य सरकारची सकारात्मक भूमिका, उद्योगांसाठी सबसिडी योजना याची माहिती दिली. तसेच व्यापार उद्यो गात विधी साक्षरता आणि अर्थसाक्षरता महत्व-पूर्ण असल्याचे सांगितले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय ऋषभ गोगड यांनी करून दिला. आभार संदिप सोमवंशी यांनी मानले.

कार्यक्रमास उत्तर महाराष्ट्र शाखा को-चेअरमन भावेश मानेक कार्यकारिणी सदस्य राजेश मालपुरे, सल्लागार दिलीप साळवेकर आदिंसह उद्यो जक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दीपक बडगुजर, अमित पाटील, शिवा अहेर, गरमक राठोड यांनी विशेष परिश्रम घेतले.

# 'फायर एनओसी' शुल्काचा राज्यात उडाला भडका !

## तब्बल २०० टक्के शुल्कवाढ : क्रेडाई संस्थेकडून कडाडून विरोध

**छत्रपती संभाजीनगर :** निवासीसंह व्यावसायिक इमारत उभारण्यापूर्वी अग्निशमन विभागाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. त्याशिवाय बांधकाम परवानगी मिळत नाही. ही एनओसी मिळविण्यासाठी ३ ते १५ रुपये प्रतिचौरस मीटरप्रमाणे असलेल्या शुल्कात राज्य सरकारने अचानक २०० पट वाढ केली आहे.

महिनाभरापासून राज्य शासनाने फायर सर्व्हिस ॲक्ट २००६ नुसार शुल्कात तब्बल २०० टक्के वाढ केली. नवीन दर १२१ ते २४२ रुपये प्रतिचौरस मीटरप्रमाणे आकारले जात आहेत. एनओसी घेण्यासाठी येणाऱ्यांचे शुल्क पाहून डोळे पांढरे होत आहेत. या प्रचंड न शुल्कवाढीला बांधकाम क्षेत्रातील ही क्रेडाई या शिखर संस्थेनेही कडाडून विरोध दर्शविला. उंच इमारतींमध्ये आग लागल्यास त्वरित उपाययोजना करता याव्यात यासाठी अग्निशमन यंत्रणा उभारणे बंधनकारक आहे. छोट्या निवासी इमारतींना एनओसी बंधनकारक नाही निवासीसह व्यावसायिक एज्युकेशन, हॉस्पिटल, मंगल कार्यालय, बिझनेस झोन, इंडस्ट्रियल आदी इमारतींना एनओसी बंधनकारक आहे. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यावर अग्निशमन यंत्रणा बसवून परत अग्निशमन विभागाचे प्रमाणपत्र भोगवटा प्रमाणपत्रासाठी घ्यावे लागत होते. इमारतीच्या प्रकारानुसार ३ ते १५ रुपयांपर्यंतचे दर आकारून अग्निशमन विभाग आतापर्यंत एनओसी देत होता. यासाठी चलन ५५ हजार ते १ लाख रुपयांपर्यंत येत होते.

राज्य शासनाने २ जून २०२३ रोजी काढलेल्या अध्यादेशानुसार नवीन शुल्कवाढ महापालिका, नगरपरिषदांमध्ये लागू करण्यात आली. अवघ्या ५० हजारांत मिळणारी एनओसी आता ११ ते ६० लाखांपर्यंत जात आहे. त्यामुळे बांधकाम व्यावसायिक त्रस्त झाले आहेत




| जुने शुल्क असे होते | |
|---|---|
| **इमारत प्रकार** | **शुल्क** |
| निवासी | ०३ ते १० रु. |
| हॉटेल | ०३ ते १२ |
| शिक्षण इमारत | ०३ ते ०७ |
| मंगल कार्यालय | ०३ ते ०७ |
| व्यावसायिक | ०३ ते ०७ |
| इंडस्ट्रियल | ०३ ते १५ |
| **नवे शुल्क असे** | |
| निवासी वापर | ६१ रुपये |
| हॉस्पिटल | १२१ ते १८२ रु. |
| कमर्शिअल | १८२ ते २४२ |
| इंडस्ट्रियल | १८२ ते २४२ |
| **नवीन कायद्यात दोनच टप्पे** | |
| ४५ मीटरपर्यंत सर्वच इमारती | |
| ४५ मीटरवरील सर्वच उंच इमारती | |

### शुल्कवाढीच्या मुद्द्यावर शासनाकडे पाठपुरावा

राज्यभरात शुल्कवाढीचा मुद्दा गाजत आहे. महाराष्ट्र क्रेडाई संघटना शासनाकडे पाठपुरावा करीत आहे. आम्ही आमच्या भावना राज्य शाखेला कळविल्या आहेत. याच संदर्भात मनपा प्रशासकांनाही निवेदन देण्यात येणार आहे. त्यांच्यासोबत पुढील आठवड्यात चर्चा करण्यात येईल. वास्तुविशारद संघटनाही आमच्यासोबत आहे.

**– विकास चौधरी, अध्यक्ष, क्रेडाई, छत्रपती संभाजीनगर**

MACCIA 100
Apex Chamber of the State 1927-2027
MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE

# 'महाराष्ट्र चेंबर बिझनेस एक्सलन्स सेंटर्स'




राज्याच्या व्यापार, उद्योग क्षेत्राची शिखर संस्था म्हणून कार्यरत 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' या शिखर संस्थेच्या कार्याची व्याप्ती जिल्हास्तरापर्यंत वाढावी यासाठी चेंबरने राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात किमान १ 'महाराष्ट्र चेंबर बिझनेस एक्सलन्स सेंटर' सुरू करण्याचे ठरविले आहे. सदर एक्सलन्स सेंटर च्या माध्यमातुन पुढील कार्ये संपादीत होणे अपेक्षित आहे.

- महाराष्ट्र चेंबर चे कार्यालय या नात्याने स्थानिक संघटना, संस्था, व्यापारी, उद्योजक, सरकारी अधिकारी यांच्याशी समन्वय
- नव उद्योजकता मार्गदर्शन केंद्र – तरूण, महिला यांच्यासह नवउद्योजकांसाठी मार्गदर्शन केंद्राचे संकलन, व्यापारी–उद्योजकांसाठी विविध मार्गदर्शन मार्गदर्शन सत्रांचे आयोजन
- मासिआ, बिझनेस नेटवर्क फोरम– सभासदांतर्गत व अन्य लोकांच्या समवेत व्यापार वृध्दीसाठी सुरू करण्यात येत असलेल्या फोरम चे व डिस्ट्रीक्ट डेव्हलपमेंट फोरम च्या कामाचे संचालन
- कौशल्य प्रशिक्षण केंद्र – चेंबरतर्फे राज्य व केंद्र शासन पुरस्कृत कौशल्य प्रशिक्षण वर्गांचे संचालन

**'सदर सेंटर्स हे चेंबरचे सेंटर्स या नात्यानेच मात्र 'रेव्हेन्यु शेअरींग' पध्दतीने म्हणजेच उत्पन्नातील काही वाटा जागा मालक यांना देण्याच्या तत्वावर संचालित करण्यात येतील.**

**सदर 'बिझनेस एक्सलन्स सेंटर्स' साठी पुढील किमान सुविधा आवश्यक आहेत.**

- १०० ते १५० स्क्वे फुटाचा स्वागत कक्ष कम ऑफीस, किमान १० लोकांची क्षमता
- ३०० स्क्वे फुटाचे मुख्य कार्यालय/मिटींग रूम
- १०० ते १५० चौ.फु. सुसज्ज पदाधिकारी केबिन, लॅपटॉपसह
- एक पदवीधर को–ऑर्डीनेटर
- किमान १० कम्प्युटर्स–टेबल व्यवस्थेसह, प्रोजेक्टर किंवा ५५ इंच स्मार्ट टीव्ही
- किमान ३५ लोकांची बसण्याची व्यवस्था, Wi-Fi Connection-Aadhar सुयोग्य बायोमेट्रीक अटेन्डन्स सिस्टीम
- सदर सेंटरची जागा ही चांगल्या लोकेशनमध्ये असावी. तळमजल्यावर किंवा पहिल्या मजल्यावरची असावी. लिफ्टची सुविधा असल्यास त्याच्यावरील मजले चालतील.
- सदर सेंटरमध्ये दरमहा साधारणपणे ६० विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण संचालित होणे अपेक्षित आहे.



















**Date of Publish : 30th September 2024** **Page No. 1 to 36**
WPP License No.: GR/KLP/114/2024-2026 License to post without prepayment. Posted on 30th September 2024 at RMS Kolhapur
Registered with Reg. of News Paper for India, Delhi under Regd. No. 20803/71, Postal Registration No. KLR-357/2024-2026

MACCIA 100
GLORIOUS 95 YEARS - MARCHING TOWARDS CENTENARY
Apex Chamber of the State 1927-2027

PRESENTS

MAHARASHTRA'S



MAHARASHTRA INTERNATIONAL TRADE EXPO

- INTERNATIONAL PAVILION
- GOVERNMENT AND STATE PAVILION
- ELECTRONICS AND DURABLES
- TEXTILES / FASHION & ACCS.
- AUTOMOBILE-FOCUS ON EV
- REAL ESTATE DEVELOPMENT
- BUILDING MATERIALS
- INTERIORS AND HOME DECOR
- BEAUTY, HEALTH AND FITNESS
- PROCESSED FOOD
- FARM AND AGRO
- TRAVEL AND TOURISM
- WRITING INSTRUMENTS
- STATIONERY AND GIFT ARTICLES

## Highlights

- Delegations from various countries
- TIE-UPS with Domestic & International trade bodies
- Seminars and Conferences
- Cultural Programmers
- Buyer Seller Meets

Supported by

MAKE IN INDIA

**FOR DETAILS CONTACT :**

**Maharashtra Chamber Of Commerce, Industry & Agriculture (MACCIA)**
Oricon House, 6th Flr., Maharashtra Chamber of Commerce Lane,
Kala Ghoda, Fort, Mumbai – 400 001,
**Tel:** +91 22 6739 5800, **Fax** : +91 22 6739 5800,
**Email:** maccia@maccia.org.in, sec.general@maccia.org.in

हे मासिक संपादक, मुद्रक, प्रकाशक ललित गांधी यांनी मालक महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर यांचेकरीता शिवम ऑफसेट,प्लॉट नं. डी-१११, फाइव स्टार एमआयडीसी, कागल-हातकणंगले, कोल्हापूर येथे छापुन बिझनेस हाऊस, १६७७, ई मेन रोड, राजारामपुरी १० वी गल्ली, कोल्हापूर - ४१६००८ येथे प्रसिध्द केले.

If undelivered please return to:
Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture
201, Sarda Sankul, Vakil Wadi, M.G. Road, Nashik-1